म. ग्रं. सं. ठाणें.
विषय इतिहास
सं. क्र. ५०७

# [शि]वाजीची बखर

जींत

कलियुगाचे प्रारंभापासून महाराष्ट्र राजांची वंशावळी देऊन इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवीपर्यंत मजकूर आला आहे.

नो. नं. ७२५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें (प्रथम प्रत)
दा. क्र. ५३५५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
पा. इति. नं. ५०७

१९३५

संपादक व प्रकाशक

[...]टस्थाने, B. A., LL. B.

ल्यामिंगटन रोड, मुंबई नं. ४

REFBK-0005355

[मू]ल्य १ रुपया.

मुद्रक–श्री. के. एन्. सापळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, १५-१७ त्रिभुवन रोड, मुंबई ४

# शिवाजीची बखर

जींत

कलियुगाचे प्रारंभापासून महाराष्ट्र राजांची
वंशावळी देऊन इंग्रजांनीं पुण्यावर झेंडा
रोवीपर्यंत मजकूर आला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ५३५५
१९३५

संपादक

एम्. एम्. कोटस्थाने, B. A., LL. B.
गिरधर भुवन, ल्यामिंगटन रोड, मुंबई नं. ४

मूल्य १ रुपया.

मुद्रक-श्री. के. एन्. सापळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, १५-१७ त्रिभुवन रोड, मुंबई ४



चित्रशाळा प्रेस, पुणें.

शिवाजी.

REFBK-0005355

५३५५

# शिवाजीची बखर

## प्रस्तावना

जनसेवा मासिकाच्या जानेवारी १९३४ चे अंकांतील उद्देशांत सूचित केल्याप्रमाणें ही बखर आम्ही आतां वाचकांस पूर्णपणें सादर करीत आहोंत. मूळ बखर मोडी लिपींत जुन्नरी सुडाच्या कागदावर लिहिलेली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं वाचनांत किंवा अक्षरओळख पडण्यांत चूक होणें शक्य आहे. परंतु अशी ठिकाणें फार थोडी आहेत. त्यामुळें मूळ बखरीचें वृत्त या छापील प्रतींत जसेच्या तसें वाचावयाला मिळतें. बखरीच्या कागदाची रुंदी साडे पांच (५½) इंच आहे, व घडी घातलेल्या पानांची लांबी नऊ (९) इंच आहे. या हिशेबानें हस्तलिखित एके बाजूस लिहिलेली अशी २०२ पानें होतात. हीं पानें सुटी नसून एकास एक चिकटविलेलीं आहेत म्हणून सर्व बखर उघडली असतां रुंदी साडे पांच इंच कायम राहून लांबी सळंग दीडशे (१५०) फूट भरते.

या बखरीचे मजकुराविषयीं विचार करितां हिचें स्थूलमानानें तीन भाग पडतात.

पहिला भाग---यांत युधिष्ठिरापासून महाराष्ट्र राजे व महंमदशाहा मुसलमान पातशाहाची वंशावळीं पानें १ ते १२ पर्यंत दिली आहे.

दुसरा भाग—शिवाजीची ९२ कलमी संकलित हकीकत असलेला भाग पानें १३ ते ५४.

तिसरा भाग---परिशिष्टाच्या स्वरूपाचा असोन त्यांत सेनापति, मुजुमदार यांची यादी, देवीचें भविष्य, शिवशकावली, व दुसरी इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवींपर्यंत मजकूर असलेली सरासरी दोनशें वर्षांची शकावली इतका मजकूर आला आहे. पानें ५४ ते ६०.

REFBK-0005355

५३५५

# शिवाजीची बखर

## प्रस्तावना

जनसेवा मासिकाच्या जानेवारी १९३४ चे अंकांतील उद्देशांत सूचित केल्या-प्रमाणें ही बखर आम्ही आतां वाचकांस पूर्णपणें सादर करीत आहोंत. मूळ बखर मोडी लिपींत जुन्नरी सुडाच्या कागदावर लिहिलेली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं वाचनांत किंवा अक्षरओळख पडण्यांत चूक होणें शक्य आहे. परंतु अशी ठिकाणें फार थोडी आहेत. त्यामुळें मूळ बखरींचें वृत्त या छापील प्रतींत जसेच्या तसे वाचावयाला मिळतें. बखरीच्या कागदाची रुंदी साडे पांच ( ५½ ) इंच आहे, व घडी घातलेल्या पानांची लांबी नऊ ( ९ ) इंच आहे. या हिशेबानें हस्तलिखित एके बाजूस लिहिलेली अशी २०२ पानें होतात. हीं पानें सुटीं नसून एकास एक चिकटविलेलीं आहेत म्हणून सर्व बखर उघडली असतां रुंदी साडे पांच इंच कायम राहून लांबी सळंग दीडशे ( १५० ) फूट भरेल.

या बखरींचे मजकुराविषयीं विचार करितां हिचें स्थूलमानानें तीन भाग पडतात.

पहिला भाग--यांत युधिष्ठिरापासून महाराष्ट्र राजे व महंमदशाहा मुसलमान पातशाहाची वंशावळीं पानें १ ते १२ पर्यंत दिली आहे.

दुसरा भाग—शिवाजीची ९२ कलमी संकलित हकीकत असलेला भाग पानें १३ ते ५४.

तिसरा भाग—परिशिष्टाच्या स्वरूपाचा असोन त्यांत सेनापति, मुजुमदार यांची यादी, देवीचें भविष्य, शिवशकावली, व दुसरी इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवींपर्यंत मजकूर असलेली सरासरी दोनशें वर्षांची शकावली इतका मजकूर आला आहे. पानें ५४ ते ६०.

REFBK-0005355

REFBK-0005355

ग्र. क्र. ५३५५

# शिवाजीची बखर

## प्रस्तावना

जनसेवा मासिकाच्या जानेवारी १९३४ चे अंकांतील उद्देशांत सूचित केल्याप्रमाणें ही बखर आम्ही आतां वाचकांस पूर्णपणें सादर करीत आहोंत. मूळ बखर मोडी लिपींत जुन्नरी सुडाच्या कागदावर लिहिलेली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं वाचनांत किंवा अक्षरओळख पडण्यांत चूक होणें शक्य आहे. परंतु अशी ठिकाणें फार थोडी आहेत. त्यामुळें मूळ बखरीचें वृत्त या छापील प्रतींत जसेच्या तसे वाचावयाला मिळतें. बखरीच्या कागदाची रुंदी साडे पांच ( ५½ ) इंच आहे, व घडी घातलेल्या पानांची लांबी नऊ ( ९ ) इंच आहे. या हिशेबानें हस्तलिखित एके बाजूस लिहिलेली अशी २०२ पानें होतात. हीं पानें सुटी नसून एकास एक चिकटविलेलीं आहेत म्हणून सर्व बखर उघडली असतां रुंदी साडे पांच इंच कायम राहून लांबी सळंग दीडशें ( १५० ) फूट भरेल.

या बखरीचे मजकूराविषयीं विचार करितां हिचें स्थूलमानानें तीन भाग पडतात.

पहिला भाग—यांत युधिष्ठिरापासून महाराष्ट्र राजे व महंमदशाहा मुसलमान पातशाहाची वंशावळीं पानें १ ते १२ पर्यंत दिली आहे.

दुसरा भाग—शिवाजीची ९२ कलमी संकलित हकीकत असलेला भाग पानें १३ ते ५४.

तिसरा भाग—परिशिष्टाच्या स्वरूपाचा असोन त्यांत सेनापति, मुजुमदार यांची यादी, देवीचें भविष्य, शिवशकावली, व दुसरी इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवींपर्यंत मजकूर असलेली सरासरी दोनशें वर्षांची शकावली इतका मजकूर आला आहे. पानें ५४ ते ६०.

REFBK-0005355

REFBK-0005355

ग्रं. क्र. ५३५५

# शिवाजीची बखर

## प्रस्तावना

जनसेवा मासिकाच्या जानेवारी १९३४ चे अंकांतील उद्देशांत सूचित केल्याप्रमाणें ही बखर आम्ही आतां वाचकांस पूर्णपणें सादर करीत आहोंत. मूळ बखर मोडी लिपींत जुन्नरी मुडाच्या कागदावर लिहिलेली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं वाचनांत किंवा अक्षरओळख पडण्यांत चूक होणें शक्य आहे. परंतु अशी ठिकाणें फार थोडी आहेत. त्यामुळें मूळ बखरीचें वृत्त या छापील प्रतींत जसेच्या तसे वाचावयाला मिळतें. बखरीच्या कागदाची रुंदी साडे पांच ( ५½ ) इंच आहे, व घडी घातलेल्या पानांची लांबी नऊ ( ९ ) इंच आहे. या हिशेबानें हस्तलिखित एके बाजूस लिहिलेली अशी २०२ पानें होतात. हीं पानें सुटी नसून एकास एक चिकटविलेलीं आहेत म्हणून सर्व बखर उघडली असतां रुंदी साडे पांच इंच कायम राहून लांबी सळंग दीडशे ( १५० ) फूट भरेल.

या बखरीचे मजकुराविषयीं विचार करितां हिचें स्थूलमानानें तीन भाग पडतात.

पहिला भाग—यांत युधिष्ठिरापासून महाराष्ट्र राजे व महंमदशाहा मुसलमान पातशाहाची वंशावळीं पानें १ ते १२ पर्यंत दिली आहे.

दुसरा भाग—शिवाजीची ९२ कलमी संकलित हकीकत असलेला भाग पानें १३ ते ५४.

तिसरा भाग—परिशिष्टाच्या स्वरूपाचा असोन त्यांत सेनापति, मुजुमदार यांची यादी, देवीचें भविष्य, शिवशकावली, व दुसरी इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवींपर्यंत मजकूर असलेली सरासरी दोनशें वर्षांची शकावली इतका मजकूर आला आहे. पानें ५४ ते ६०.

REFBK-0005355

REFBK-0005355

५३५५

# शिवाजीची बखर

## प्रस्तावना

जनसेवा मासिकाच्या जानेवारी १९३४ चे अंकांतील उद्देशांत सूचित केल्या-प्रमाणें ही बखर आम्ही आतां वाचकांस पूर्णपणें सादर करीत आहोंत. मूळ बखर मोडी लिपींत जुनरी सुडाच्या कागदावर लिहिलेली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं वाचनांत किंवा अक्षरओळख पडण्यांत चूक होणें शक्य आहे. परंतु अशी ठिकाणें फार थोडी आहेत. त्यामुळें मूळ बखरीचें वृत्त या छापील प्रतींत जसेच्या तसे वाचावयाला मिळतें. बखरीच्या कागदाची रुंदी साडे पांच ( ५½ ) इंच आहे, व घडी घातलेल्या पानांची लांबी नऊ ( ९ ) इंच आहे. या हिशेबानें हस्तलिखित एके बाजूस लिहिलेली अशी २०२ पानें होतात. हीं पानें सुटी नसून एकास एक चिकटविलेलीं आहेत म्हणून सर्व बखर उघडली असतां रुंदी साडे पांच इंच कायम राहून लांबी सळंग दीडशे ( १५० ) फूट भरते.

या बखरीचे मजकुराविषयीं विचार करितां हिचें स्थूलमानानें तीन भाग पडतात.

पहिला भाग--यांत युधिष्ठिरापासून महाराष्ट्र राजे व महंमदशाहा मुसलमान पातशाहाची वंशावळीं पानें १ ते १२ पर्यंत दिली आहे.

दुसरा भाग—शिवाजीची ९२ कलमी संकलित हकीकत असलेला भाग पानें १३ ते ५४.

तिसरा भाग—परिशिष्टाच्या स्वरूपाचा असोन त्यांत सेनापति, मुजुमदार यांची यादी, देवीचें भविष्य, शिवशकावली, व दुसरी इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवींपर्यंत मजकूर असलेली सरासरी दोनशें वर्षांची शकावली इतका मजकूर आला आहे. पानें ५४ ते ६०.

आतां या तीनही भागासंबंधानें स्वतंत्रपणें विचार करूं.

पहिल्या भागांत पानं ७ वर दर्शविल्याप्रमाणें युधिष्ठिर, वीरसेन, नरहरी, मंत्री, नृपसिंग, विक्रमजित, जैसिंग, माधवसेन धीरंधर, पृथ्वीपाल, अशा दहा महाराष्ट्र वंशांतील राजांची नांवनिशीं वर्षे, मास, दिवस सुद्धां दिली आहे. यांत एकंदर १२० पुरुष येतात. व त्या सर्वांनीं मिळून ३९२७ वर्षे राज्य केलें. त्यानंतर मुसलमान पातशाही झाली. ती पातशाही महंमदशापर्यंत ९१५ वर्षपावेतों अस्तित्वांत होती. याप्रमाणें एकंदर ४८३९ ( ४८४२ ? ) वर्षांचीं राजे व पादशहांची नामावली येत आहे. ( पान १२ ). यांत तीन वर्षांची चूक येते. परंतु सर्व आकडे बखरीप्रमाणेंच दिले असल्यानें ही चूक प्रतींत किंवा नकलेंत असली पाहिजे. परंतु ५००० वर्षांत ३ वर्षे ही क्षुल्लक बाब आहे.

या वंशावळी संबंधीं विचार करितां असें दिसून येतें कीं, निराजी राहूजी हुजीब ( पा. १२, १३ ) यास दिल्लीची वंशावळी पाठविण्याविषयीं रायगडीहून आज्ञा झाली होती. त्यावरून अनाजी रंगनाथ मळेकर व येसाजी मल्हार वाईकर यांनी पारसीची नक्कल हिंदवी करून रायगडास पाठविली. व पुढें अनाजीचा पुत्र 'खंडो' यांनीं अनाजीजवळ असलेल्या तर्जुम्यावरून प्रस्तुत वंशावळी लिहिली आहे. निराजी हा शिवाजीबरोबर दिल्लीचे कैदेंत होता, व त्यानें बैराग्याचे वेषांत महंत बनून शिवाजीस कैदेंतून निसटून जाण्यास मदत केली होती. ( क. ५४ )

या ५००० वर्षांच्या नामावळीकडे पाहिलें असतां त्यांत शक, संवत् वगैरेचा फारसा उल्लेख केलेला नाहीं. परंतु वर्ष, महिने, दिवस फार कसोशीनें दिलेले दिसतात. आतां दिलेली माहिती कितपत ग्राह्य समजावी हा सध्यां अस्तित्वांत असलेल्या ऐतिहासिक साहित्याबरोबर तौलनिक दृष्टीनें अभ्यास करणाऱ्या इतिहास संशोधकाचा प्रश्न आहे. बखरींतील माहिती छापील पुस्तकरूपानें आम्ही जनतेपुढें ठेवीत आहों. परंतु हल्लींच्या इतिहासग्रंथांत जी विश्वसनीय मानलेली सनावली दिली असते तिच्या अनुरोधानें खाली दिलेल्या कोष्टकाप्रमाणें स्थूलमानानें निरनिराळ्या राजवंशाचे सन बसवितां येतात.

| वंशाचें नाव | इसवी सन | | | | सुमारें | वर्षे |
|---|---|---|---|---|---|---|
| युधिष्ठिर | ३१०२ | B. C. | ते | १२४५ | B. C. | १८५७ |
| वीरसेन | १२४५ | B. C. | ते | ८२७ | B. C. | ४१८ |
| नरहरी | ८२७ | B. C. | ते | ३४८ | B. C. | ४७९ |
| मंत्री | ३४८ | B. C. | ते | ३८ | B. C. | ३१० |
| नृपसिंग | ३८ | B. C. | ते | २ | A. D. | ४० |
| विक्रमजित् | २ | A. D. | ते | १५१ | A. D. | १४९ |
| जैसिंग | १५१ | A. D. | ते | २९८ | A. D. | १४७ |
| माधवसेन | २९८ | A. D. | ते | ४०६ | A. D. | १०८ |
| धीरंधर | ४०६ | A. D. | ते | ७३८ | A. D. | ३३२ |
| पृथ्वीपाल | ७३८ | A. C. | ते | ८२४ | A. D. | ८६ |
| एकंदर | ३१०२ | B. C. | ते | ८२४ | A. D. | ३९२६ |
| मुसलमान पातशहा | ८२४ | A. D. | ते | १७३८ | A. D. | ९१४ |
| | | | | | एकूण. | ४८४० |

याप्रमाणें हिशेब धरिल्यास कलियुगाचा प्रारंभ इसवी सनापूर्वी ३१०२ वर्षे येतो. व तें अनुमान कित्येक इतिहासज्ञानीं केलेल्या अनुमानाशीं जुळतें येतें. तसेंच ठोकळ मानानें महाराष्ट्रांतील युधिष्ठिर वंशानें साधारणतः १९०० वर्षे राज्य केलें,बाकीच्या ९ महाराष्ट्र वंशांनीं तितकींच वर्षे, व मुसलमानानीं १००० वर्षे याप्रमाणें जवळ जवळ ४८०० वर्षांचा हिशेब बसतो.

आतां या बखरीचा दुसरा भाग म्हणजे ज्यांत मालोजीपासून शिवाजीचे मृत्यु-पर्यंत ९२ कलमांत निवेदन केलेला वृत्तांत येतो त्याविषयीं थोडासा विचार करूं. या बखरींत निवेदन केलेली हकीकत व इतिहास म्हणून प्रसिद्ध असलेला भाग यांत कितपत तफावत आहे तें इतिहासनिरीक्षकांचें काम आहे. त्याविषयीं या लहानशा उपोद्घातांत विचार करणें शक्य नाहीं. तथापि कांहीं ठळक गोष्टीसंबंधीं थोडेसें दिग्दर्शन याखालीं करीत आहों.

शिवाजीचा राज्यसंस्थापनेचा काल अत्यंत धामधूमीचा होता. अशा वेळीं राज्य कमाविणें व तें राखणें म्हणजे त्याकरितां असामान्य, लोकोत्तर बुद्धिमत्तेची जरूरी होती हें निर्विवाद होय. व तसली बुद्धी शिवाजी महाराजांचे ठायीं होती यांत त्यांची कर्तबगारी पाहिली असतां मुळींच शंका रहात नाहीं व त्यांनीं आपल्या हयातींत राज्य कमाविणें, व तें राखणें ह्या दोन्ही गोष्टी केल्या होत्या. परंतु कमाविण्यापेक्षां मिळविलेलें राज्य टिकविण्याकरितां नेहमीं जास्त कर्तबगारीची व मुत्सद्दे-गिरीची जरूरी असते. शिवाजीनंतर राज्य टिकविण्यास लागणाऱ्या या विशिष्ट गुणांस ओहोटी लागल्यामुळें मराठ्यांचें राज्य पुष्कळ अंशीं कमकुवत झालें.

श्रीमंताच्या मुलांना वाईट मार्गावर नेण्याकरितां त्यांचे भोवतीं नेहमीं आपमत-लवी, हांजी हांजी करणारी मंडळी गोळा होत असते. व मुलास दुर्वर्तनाकडे प्रवृत्त करण्यांत यांचा फायदा असतो. मग यामुळें तें श्रीमंताचे घराणें पार बुडालें तरी यांना त्याची क्षिती नसते. दुसरें, वडिलांची संपत्ति आयती प्राप्त झाली असली म्हणजे ती मिळविण्यास काय श्रम, कष्ट पडले असतील त्याचे मुलांस काय होय ? तितक्यांतून त्यावर पूर्ण देखरेख करण्याकरितां कळकळीची माणसें नसली म्हणजे वरील स्वार्थसाधू मंडळीचे चांगलेच फावते. या साध्या गोष्टीचें प्रत्यंतर संभाजीचे संबंधांत दिसून येते. शिवाजी महाराज ही गोष्ट जाणून होते. परंतु कार्यबाहुल्या-मुळें किंवा पुरेशा वेळेच्या अभावीं त्यांना या संबंधांत विशेष कांहीं करतां आलें नाहीं. व शेवटीं शिवाजीचे निधनानंतर मराठी राज्यास उतरती कळा लागण्याचें हें एक जबरदस्त कारण घडलें.

आणखी एक गोष्ट म्हणजे फंदफितूरीची. आपल्या राज्यांत किंवा गोतावळ्यांत शत्रु कोण व मित्र कोण हें समजणें केव्हां केव्हां महामुष्किलीचें होऊन बसते. बाह्यात्कारीं जो 'आपला' म्हणून समजावा तो 'आंतून' शत्रूकडे लागलेला असतो, अशी उदाहरणें या बखरींत वाचावयास मिळतात. याचें कारण पाश्चात्य देशांत ज्याला स्वदेशाभिमान म्हणून हल्लीं म्हणतात तो गुण त्यावेळेस पूर्णावस्थेला पोहोंचला नव्हता. या गुणाचा नुकताच कोठें उदय झाला होता व या गुणाचें जाज्वल्य स्वरूप म्हणजे स्वतः शिवाजी महाराजच होत.

या फंदफितुरीची काळी छाया महाराष्ट्राच्या किंबहुना हिंदुस्थानदेशाच्या इतिहासांवर पडलेली ठायीं ठायीं दिसून येते. व अद्यापही या अवगुणाचा जितका नायनाट व्हावयास पाहिजे तितका न झाल्यानें एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस जोम येत नाहीं. आतां याची कारणमीमांसा करूं गेले असतां तो एक वेगळा स्वतंत्र विषयच होऊं पाहील, म्हणून ह्या छोट्याशा प्रस्तावनेंत दिग्दर्शन करण्यापलीकडे जास्त विवेचन करणें शक्य नाहीं.

या बखरीच्या वाचनानें आणखी एक गोष्ट डोळ्यासमोर उभी राहते ती ही कीं त्या वेळीं नीतीमत्ता, दगाबाजी, क्रौर्य वगैरेची जीं उदाहरणें मधून मधून दृष्टीस पडतात त्याकडे आधुनिक कालच्या चष्म्यानें पाहणें योग्य होणार नाहीं. कारण राजनीती ही भर्तृहरीच्या ' वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा ' या वचनाप्रमाणें स्थल, काल, परिस्थिती यांच्या अनुरोधानें लवचिक व बदलणारी असते.

वैयुक्तिक नीती व राजकीय नीती यामध्यें महदंतर असते. शांततेच्या काळीं जी शिक्षा देणें गर्ह्य समजलें जाते तसली शिक्षा धामधूमीचे कालांत राजकीय नीतीचे पायीं पुष्कळशा निरपराधी लोकासही देण्याची वेळ येते. व तसलीं उदाहरणें या बखरींत कांहीं ठिकाणीं दिसून येतात. याचें कारण शांततेच्या वेळचे कायदे, नीतीच्या कल्पना धामधूमीचे काळीं ( state of war ) अपुरे पडतात. व त्यावेळीं कडक उपाय योजना ( martial law ) करावी लागते. त्यामुळें एकंदर राज्याच्या सुरक्षिततेकरितां इतिहासांतरी केलेल्या विश्वासघात, दगाबाजी, फसवणूक वगैरे कृत्याकडे केव्हां केव्हां निराळ्या दृष्टीनेंच पाहणें जरूरीचे असते.

शिक्षा देण्याचेही अनेक प्रकार दिसून येतात. हातपाय तोडणें, डोळे फोडणें, चौरंग करून किंवा गारींत घालून मारणें, हत्तीचें पायीं देणें, रथास जोडून फरफटणें, सुळावर चढविणें, फाशी देणें, विजेचा धक्का देऊन यमसदनीं पाठविणें हे व असले शिक्षा देण्याचे प्रकार कालमानाप्रमाणें निरनिराळें असणें शक्य आहे. सुधारणायुग जसजसे पुढें पुढें सरकत आहे तसतसे या प्रकारांतही सुधारणा होत चालली आहे. म्हणून केवळ याबद्दल जुन्या लोकास दोष देण्याचें विशेष कारण नाहीं.

या सर्व बाबीकडे आतां हंसक्षीर न्यायानें पाहिले पाहिजे. सध्याचे कालीं अनुकरणीय अशा चांगल्या गोष्टी घेऊन बाकीच्यास घडून गेलेल्या गोष्टीपेक्षां, निव्वळ इतिहासापेक्षां जास्त महत्व देण्याची जरूरी नाहीं. शत्रु आणि मित्र, हाडवैरी व कट्टे दुष्मन्, वगैरे विरुद्ध पक्षोपपक्षांतील लोक आतां कालवश झाले आहेत. म्हणून त्यावेळची हल्लीं नामशेष झालेली भांडणें पुनः उकरून काढून, त्याचा काथ्याकूट करून डोकीं गरम करून घेण्यांत साधारण लोकांना तरी कांहीं फायदा नाहीं. बाकी शांत डोक्याच्या इतिहाससंशोधकांना हा न्याय लागू करितां येणार नाहीं हें उघड आहे.

बखरीचा तिसरा भाग जो परिशिष्टरूपाचा आहे म्हणोन वर लिहिलें आहे, त्यांतील शकावल्या हल्लीच्या सनावल्याशी ताडून पाहिल्या पाहिजेत. व जरूर तो फरक करून घेतला पाहिजे. हा भाग इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवींपर्यंतचा असल्यानें फार अर्वाचीन आहे, व त्यावरून या बखरींतील मजकूर निरनिराळ्या वेळीं लिहिला गेला असला पाहिजे हे उघड होते. ह्या भागाचा संशोधकांस तौलनिक पद्धतीनें उपयोग होण्यासारखा आहे.

आतां या बखरीच्या वाचनापासून सद्यःस्थितींत काय बोध घ्यावा याविषयीं दोन शब्द लिहून आम्ही ही प्रस्तावना पुरी करितो. शिवाजी महाराजानीं ज्या परिस्थितींत राज्य स्थापना केली ती आतां उरली नाहीं. परंतु देशाभिमान, राष्ट्राभिमान, समयसूचकता, शौर्य, नीती वगैरे जे गुण शिवचरित्रांत दिसून येतात ते आपणांत आणावयाचा प्रयत्न केल्यास त्याचा पुष्कळ उपयोग होणार आहे. समाजांत सध्यां मधून मधून बोकाळूं पाहात असलेली, नाटकी, उछृंखल, बालिश, उथळ, बेशिस्त, वृत्ती सोडून देऊन राहणींत, आचारांत, विचारांत, भारदस्तपणा, बहुश्रुतपणा, एक वेळीं राज्य कमाविलेल्या शूरांच्या वंशजास शोभेल अशी कडकडीत शिस्त, धैर्य, लोकसंग्रह वगैरेनीं युक्त अशी नवी जोमदार वृत्ती कशी उत्पन्न होईल याकडे लक्ष्य दिलें पाहिजे. नुसते नांवाचे, नामधारी, शिवाजीचे शूर मरहट्याचे वंशज म्हणवून घेण्यांत, आणि आमच्या पूर्वजानीं राज्यें कमाविली होती, हें सांगण्यांत काय पुरुषार्थ आहे? राज्यें कमाविली पण गमाविली हें दूषण कांहीं कमी नाहीं.

त्यापेक्षां ज्यांच्या पाठीमागें सोज्वल इतिहास नाहीं ते तरी फार बरें. नवी विटी नवें राज्य.

शिवाजीचे शूर मरहठ्यावर, विशेषतः महाराष्ट्रीयावर एक वेळचे राज्यकर्ते म्हणून एक विशिष्ठ जबाबदारी येऊन पडते. ती चुकवितां येणार नाहीं. जातिबंधनें तोडावीं कीं जोडावीं; अभक्ष्यभक्षण, मांसाहार करावा कीं त्याजावा; कुलीन स्त्रियांनीं रंगभूमिवर येऊन नाचावें किंवा पुरुषानींच विडंबनयुक्त बाष्कळ नाटकें लिहून किंवा अंगविक्षेप करून स्वतःस नटवर्य, नटसम्राट, गायन विशारद इत्यादि पदव्या लावून घ्याव्या; इत्यादि शुष्क वादविवाद वाढवून कालक्षेप करण्यांत काय अर्थ आहे? असल्या फंदांत पडून, हलका पेशा पतकरून किंवा मादक पदार्थांचे व्यसनांत गुरफटून इतराकडून 'हे पाहा अधोगतीस लागलेले शूर शिवाजीचे किंवा महाराष्ट्रीयाचे वंशज' म्हणून बोट दाखवून घेणें व मानखंडना, मानहानि, अवहेलना, अपमान मान खालीं घालून सहन करणें, यापेक्षां 'दुर्गति,' 'दैवदुर्विलसित' कोणतें असूं शकणार?

त्यापेक्षां हल्लींच्या कालमानाला अनुरूप अशीं निरनिराळ्या विषयांतील संशोधन कार्यें, औद्योगिक चळवळी, नौकागमन, विमानविद्या, परदेशगमन, व्यापार, निरनिराळ्या शास्त्रांतील प्रावीण्य संपादन याकडे जास्त लक्ष्य पुरविल्यास 'शिवाजीचे वंशज' 'अस्सल मरहठा' वगैरे नामाभिधानें सार्थ होणार नाहींत काय?

संपादक

ता........
ता........
र नं.

# अनुक्रमणिका

अनुक्रमणिका ......... १—७
युधिष्ठिरापासून महंमदशहापर्यंत वंशावळ ......... १-१२
९२ कलमी बखर ......... १३-५४

१ मालोजी व विठोजी भोसले सिंदखेडास लुखजी जाधवरावाकडे चाकरीस राहतात. २ शाहाजी राजाचा जन्म. ३ शिमगासण. शाहाजी व जिजावा गुलाल खेळतात. जाधवराव ' जोडा इजोगा ' म्हणून सहज उद्गारतात. ४ मालोजी व विठोजी यांचा जाधवरावाबरोबर बेबनाव. ५ मालोजी परत येरुळास—भवानीचा वर. ६ जाधवरावाचा सिंदखेडकरावरोबर ' सोगाइ 'चा दावा. ७ मशींदींत मेलेले डुक्कर. पातशाहाची जाधवरावावर इतराजी. ८ शाहाजीबरोबर जिजावाचा वाङ्निश्चय. ९ शाहाजी जिजावाचें लग्न. १० मालोजीचा दानधर्म—घृष्णेश्वर देवालय......... १३-१८

११ निजामशाहाचा अंत. शाहाजी राजे दिवाण. १२ जाधवराव ' हरोल ' होऊन दौलताबादेवर दिल्लीच्या बादशाहाकडून स्वारी. १३ माहुलीस वेढा. १४ शाहाजी विजापुरास ' पलोन ' गेले. १५ शाहाजीचा पाठलाग. शिवाजीचा शिवनेरीस जन्म. १६ शाहाजीस कर्णाटकची जहागीर. दिल्लीची फौज परतली. १७ मलिकंबराची दौलताबादेस वजीरी. १८ मलिकंबराची धामधूम व शाहाजी वगैरेकडून पराभव. १९ नागर गांवचे ' तुळा 'पूर कसें झाले. २० मोरो तानदेव यांची भुमेगिरी. शाहाजीच्या जहागिरी. ......... १९-२४

२१ शाहाजीचें लग्न. मुरार जगदेव यांचा ' चौरंग ' करून शिरच्छेद. २२ शाहाजीनें चंदावर घेतलें. २३ मलिकंबर व साबाजी अनंत यांचा मृत्यु. औरंगजेब दक्षिणेस सुभा स्थापन करितो. २४ दादो कोंडदेव याचा मृत्यु. शिवाजीनें सर्व मुलुखांची व्यवस्था आपले ताब्यांत

घेतली. २५ शिवाजी व औरंगजेब यांचा दावा लागला. २६ औरंगशहा दिल्लीचा पातशा झाला. २७ शिवाजीचा पुरंदरचे निलोजी निलकंठराव याचबरोबर दावा. २८ पुरंदर किल्ला शिवाजीचे स्वाधीन. २९ शिवाजी चाकण, राजगड, तोरणा वगैरे किल्ले ताब्यांत घेतो. शिवाजीचा जावळीच्या ‘ मोरे ’बरोबर ‘दावा’ व ‘फत्ते’. ३० जावळी राज्य खालसा... २४–२९

३१ विजापूरकर व शिवाजी यांचा दावा लागला. आबदुल्लाखानाची शिवाजीवर मोहीम. ३२ दोघांची प्रतापगडाखालीं भेटीची तयारी. ३३ आबदुल्लाखान सदरे सन्निध येतो. ३४ आबदुल्लाखान पोटीं बिचवा मारून ठार. ३५ खानाची फौज बाईस ‘ बुडविली ’. ३६ सातारा, चंदन वंदन इ. गड घेतले. ३७ आबदुल्लाखानाचा पुत्र फाजिलखानाचा पनालियास वेढा. ३८ शिवाजी वेढ्यांतून निसटून गेला. ३९ बाजी प्रभूची स्वामिभक्ती व मृत्यु. ४० पिंगळे यास पेशवाई. ......... २९–३४

४१ मोहोकोमसिंगाची शिवाजीवर मोहीम. पराभव व मृत्यु. ४२ शिवाजीचें लग्न. राज्याची बंदोबस्ती. ४३ शास्ताखानाची शिवाजीवर रवानगी. काऊजी बंदा मारिला. ४४ शास्ताखानाचें शिवाजीस पत्र. ४५ त्यावर शिवाजीचे प्रत्युत्तर. ४६ शास्ताखानाचा ‘ अंगठा ’ उडाला. त्याचा पुत्र मारिला. ४७ शास्ताखान पुण्यास परतला ४८ मिर्जा राजा सुभा झाला. ४९ मिर्जा राजाचा कोंढाणा सिंहगडास वेढा ५० मिर्जा राजाची शिवाजीबरोबर भेट, दिल्लीस जाण्याचा मनसुबा. ......... ३४–३८

५१ रामसिंगाबरोबर लवाजमा घेऊन शिवाजीचें दिल्लीस प्रयाण. ५२ शिवाजीस लष्करासुद्धां कैद. ५३ लष्करास परत जाऊं दिले. ५४ शिवाजी कैदेंतून निसटला. ५५ शिवाजी बैरागी वेषांत यात्रा करून रायगडास परत. ५६ संभाजी रायगडास परतला. ५७ डबीर व कोरडे यांची कैदेतून सुटका. ५८ मिर्जा राजावर दिल्लीची इतराजी. दलेलखान दक्षिणचा सुभेदार. ५९ संभाजीचे दलेलखानाबरोबर गुप्त खलबत. संभाजीस कैद. ६० संभाजीची सुटका. ......... ३८–४२

६१ दलेलखानास विषाचा प्याला. ६२ शिवाजीचा दिल्लीबरोबर तह. ६३ सुरत लुटली. ६४ राजारामाचा जन्म. ६५ हुसनूर पेठ लुटली. सिवाप्पा नाइकाशी तह. ६६ शाहाजीस विजापूरकराकडून कैद. ६७ रणदुल्लाखानाची रदबदली. ६८ शाहाजीची सुटका. ६९ शिवाजीकडून बाजी घोरपड्याचें पारिपत्य. ७० शाहाजी व शिवाजीची भेट....... ४२–४६

७१ प्रतापराव गुजराचा मृत्यु. ७२ शाहाजीचा घोड्यावरून पडून मृत्यु. ७३ विजापूरकराबरोबर तह. ७ लक्ष होन नालबंदी. ७४ भागानगरच्या तानशाहावरोबर तह. ७५ रघुनाथराव हणमंते यांचा येकाजीशी बेबनाव. ७६ चंदावरचे राज्य घेण्याची शिवाजीबरोबर मसलत. ७७ शिवाजी कनकगिरीकडे कूच करितो. ७८ भागानगरच्या तानशाकडून लष्करचा खर्च घेतला. ७९ भागानगरीस एक महिना मुक्काम. ८० कनोलकराजवळून ५ लक्ष होन घेतले. श्रीशैल्याची यात्रा केली........ ४७–५०

८१ वेरुळास वेढा. चंदी घेतली. ८२ चंदावरचें राज्यांत वाट्याबद्दल मागणी. ८३ चंदावरच्या फौजेशी युद्ध. ५० लक्ष होनाचा मुलूख घेतला. ८४ विजापूरकराशी युद्ध. हुसेनखान मायणा व लाधीखान यांचा पाडाव. ८५ कापले व बहादुर बिंडा किल्ला घेतला. ८६ बहिरराव मोहिते व मलेकर यांना बक्षिसें दिलीं. ८७ शिवाजीचे मौंजीबंधन व राज्याभिषेक ८८ रणमस्तखानावरोबर लढाई. ८९ शिवाजीचा मृत्यु. ९० संभाजी पनालियास. ९१ नव्वद प्रकरणांत संकलित कथा वर्णिली. ९२ हस्ताक्षर खंडो अनाजी मळेकराचे. ......... ५०–५४

परिशिष्टः—भवानी वाक्यकथन. सेनापति व मुजूमदाराची यादी. शिवशकावली. शिवजन्मापासून इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवीपर्यंतची दुसरी शकावली. ......... ५४–६०

९२ कलमी बखरींतील नांवाची सूचि ......... ६१–६४

नद्या, ओढे, किल्ले, गड, घाट, देश, प्रांत, गावें वगैरेची सूचि......... ६५–६६

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा भूपती | ११ | ६१ | ७ | २ |
| ,, रणजीत | १२ | ६५ | १० | २९ |
| ,, बीरजित | १३ | ६४ | ७ | ३ |
| ,, भीमसेन | १४ | ५५ | ८ | २९ |
| ,, सुकमल दंडी | १५ | ६२ | ० | ३ |
| ,, नरहरी दंडी | १६ | ६१ | १० | ४ |
| ,, सुजीतरथ | १७ | ७२ | ११ | ३ |
| ,, सूर | १८ | ५८ | ० | ८ |
| ,, पर्वत | १९ | ५० | ८ | २१ |
| ,, मंदुकरशा | २० | ५२ | ४ | ० |
| ,, तोडरमल | २१ | ४८ | १० | २९ |
| ,, भीमदंडी | २२ | ४७ | ८ | १७ |
| ,, नरहरी | २३ | ४७ | ११ | ० |
| ,, पूर्णमल | २४ | ४४ | ८ | १७ |
| ,, सारंगदंडी | २५ | ५६ | ० | ० |
| ,, रूप | २६ | ५४ | १० | २ |
| ,, अभिमन्य | २७ | ५१ | ११ | ८ |
| ,, धनपाल | २८ | ४८ | ७ | ४ |
| ,, भीम | २९ | ५८ | ५ | १५ |
| ,, लखमीदंडी | ३० | ४८ | ११ | २१ |

एकूण पुरुष ३० वर्षे १८५६ मा. ११ दि. १२

याउपरी लखमीदेवाचा वजीर वीरसेन होता. त्यानें लखमीदेवास मारून राज्य घेतलें. पुरुष १० या॥ मु॥ जमाहो.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा वीरसेन | १ | ५७ | ९ | १७ |
| ,, शूरसेन | २ | ४२ | ८ | ११ |
| ,, वीरशा | ३ | ४२ | १० | ७ |
| ,, अनंग | ४ | ४७ | ८ | २३ |
| ,, हररूप | ५ | ४५ | ९ | १७ |
| ,, शूरसेन | ६ | ४३ | ३ | ४ |
| ,, पर्वत | ७ | ४२ | ९ | २४ |
| ,, शूरपाल | ८ | ३८ | २ | ५ |
| ,, द्रुपद | ९ | ३५ | ४ | १४ |
| ,, पृथ्वीपाल | १० | २१ | ८ | ११ |

एकूण १० पुरुष वर्षे ४१८ मा. २ दि. १३

याउपरी नरहरिनाथ होता त्यानें पृथ्वीपालास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा नरहरी नाथु | १ | ३५ | १० | ८ |
| ,, जेतसिंग | २ | २७ | ७ | १९ |
| ,, बेरागमल | ३ | २१ | २ | १३ |
| ,, दिग्पाल | ४ | ३५ | ४ | १ |
| ,, महाबळ | ५ | ४५ | ८ | ७ |
| ,, अमृतपाळ | ६ | २८ | ८ | १० |
| ,, तेजपाळ | ७ | २८ | ११ | १० |
| ,, माणिकचंद | ८ | २७ | ७ | २१ |
| ,, कामचंद | ९ | ४२ | ५ | १० |
| ,, हरगौण | १० | ७७ | ० | ११ |
| ,, जीवनगौण | ११ | २३ | ९ | २७ |

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा रिध्यवंग | १२ | २३ | ७ | २९ |
| ,, भार्गव | १३ | ३५ | २ | २० |
| ,, उदीतकंठ | १४ | २३ | ११ | २४ |

एकूण पुरुष १४ वर्षें ४७९ मा. २ दि. ०

याउपरी उदीत कंठाचा मंत्री होता त्यानें उदीतकंठास मारून राज्य घेतले.

| | पुरुष | वर्षें | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा मंत्री | १ | १४ | ४ | ० |
| ,, चंद्रपाळ | २ | १६ | ८ | २४ |
| ,, सुंदरपाळ | ३ | २१ | ४ | १८ |
| ,, देशपाळ | ४ | ११ | ० | ११ |
| ,, रामपाळ | ५ | ४७ | ११ | १२ |
| ,, माधवपाळ | ६ | १० | ८ | २ |
| ,, राजपाळ | ७ | ४० | १० | १० |
| ,, गोविंदपाळ | ८ | १८ | ७ | ० |
| ,, भीमपाळ | ९ | १६ | १० | १३ |
| ,, अमृतपाळ | १० | १६ | ७ | १९ |
| ,, बालपाळ | ११ | १२ | १ | १३ |
| ,, मदनपाळ | १२ | १९ | ११ | १३ |
| ,, भूपाळ | १३ | १४ | ९ | २२ |
| ,, हरपाळ | १४ | १३ | ३ | ४ |
| ,, कर्मपाळ | १५ | १५ | ० | २५ |
| ,, विक्रमपाळ | १६ | १९ | ११ | १३ |

एकूण पुरुष १६ वर्षें ३१० मा. २ दि. १९

याउपर नृपसिंग राजा यानें राजा विक्रमपाळास मारोन राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा नृपसिंग | १ | १२ | ० | ७ |
| ,, उदयपाळ | २ | ६ | ५ | ५ |
| ,, श्रीपाळ | ३ | ८ | २ | १ |
| ,, केशवपाळ | ४ | ३ | ३ | २९ |
| ,, सादतपाळ | ५ | १० | ० | १८ |

एकूण पुरुष ५ वर्षे ४० मा. ० दि. ०

या उपरी राजा सादतपाळ यास राजा विक्रमजित् यानें मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा विक्रमजित् | १ | १२ | ७ | १९ |
| ,, रामचंद्र | २ | १३ | ३ | ७ |
| ,, श्रीचंद्र | ३ | १४ | ९ | १४ |
| ,, मुचुकचंद | ४ | २ | २ | ० |
| ,, कल्याणचंद | ५ | १० | ५ | ४ |
| ,, सूरचंद | ६ | १६ | ३ | १ |
| ,, भीमचंद | ७ | १६ | ३ | १ |
| ,, गोविंदचंद | ८ | ११ | ७ | १२ |
| भावती गोविंदचंदाची स्त्री तिनें राज्य केलें | ९ | १ | ० | १८ |
| राजा प्रतिमल भावती उपर राजा झाला | १० | ७ | ५ | १९ |
| ,, गोविंद | ११ | १९ | ७ | १८ |
| ,, पूर्णप्रेम | १२ | ७ | ७ | १९ |
| ,, महानंद | १३ | १५ | ७ | १८ |

एकूण पुरुष १३ वर्षे १४८ मा. १० दि. ०

या उपरी जयसिंग वंगालियाहून आला त्यानें महानंदास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा जेसिंग | १ | १८ | ५ | २१ |
| ,, सूर | २ | १२ | ४ | १२ |
| ,, क्षीरसेन | ३ | १५ | ७ | १२ |
| ,, माधवसेन | ४ | ११ | ३ | १३ |
| ,, देवसेन | ५ | २० | ८ | ५ |
| ,, मृसेन | ६ | ५ | १० | ९ |
| ,, कल्याणसेन | ७ | ४ | ८ | २१ |
| ,, हरीसेन | ८ | ५ | १० | ९ |
| ,, ब्रह्मसेन | ९ | ८ | ११ | ५ |
| ,, नारायणसेन | १० | ५ | २ | १८ |
| ,, लखमीसेन | ११ | २६ | ७ | १५ |
| ,, दामोदरसेन | १२ | ११ | ५ | १५ |

एकंदर पुरुष १२ वर्षे १४७ मा. १ दि. ५

याउपर राजा माधवसेन उत्तरेहून आला त्यानें दामोदरसेनास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा माधवसेन | १ | १७ | १० | ६ |
| ,, दीनसेन | २ | १४ | ५ | ० |
| ,, रणसिंग | ३ | १२ | ३ | २४ |
| ,, सेरसिंग | ४ | १० | ८ | ११ |
| ,, बीरसिंग | ५ | ४५ | ० | २४ |
| ,, नृपसिंग | ६ | ८ | ० | ४ |

एकूण पुरुष ६ व. १०८ मा. ४ दि. ९

याउपर धीरंधर राजा यानें नृपसिंगास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा धीरंधर | १ | ४२ | ७ | ० |
| ,, सेन | २ | ५६ | १० | ९ |
| ,, कंठ | ३ | ४५ | २ | ८ |
| ,, महादेव | ४ | २० | २ | ६ |
| ,, बीरनाथ | ५ | २५ | ५ | २५ |
| ,, जीवन | ६ | ४२ | २ | २५ |
| ,, उदयसिंग | ७ | ३७ | ४ | २९ |
| ,, कुलानंद | ८ | ५२ | ३ | ८ |
| ,, लल्हाट | ९ | १० | १ | १३ |
| | पुरुष ९ | व. ३३२ | मा. ३ | दि. २३ |

याउपर पृथ्वीपाल पूर्वेहून आला त्यानें लल्हाटास मारून राज्य घेतलें.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा पृथ्वीपाळ | १ | १४ | ५ | ७ |
| ,, दुर्जनपाळ | २ | ११ | ० | १३ |
| ,, उदयपाळ | ३ | १३ | ७ | १४ |
| ,, चट (?) पाळ | ४ | १० | २ | १९ |
| ,, दिठोरा | ५ | ३६ | ४ | १७ |
| | पुरुष ५ | व. ८५ | मा. ८ | दि. १० |

## तेरीज एकंदर

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| राजा युधिष्ठिर | ३० | १८५६ | ११ | १२ |
| ,, वीरसेन | १० | ४५८ | २ | १३ |
| ,, नरहरी | १४ | ४७९ | २ | ० |
| ,, मंत्री | १६ | ३१० | २ | १९ |
| ,, नृपसिंग | ५ | ४० | ० | ० |

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| ,, विक्रमजित् | १३ | १४८ | १० | ० |
| ,, जैसिंग | १२ | १४७ | १ | ५ |
| ,, माधवसेन | ६ | १०८ | ४ | ९ |
| ,, धीरंधर | ९ | ३३२ | ३ | २३ |
| ,, पृथ्वीपाल | ५ | ८५ | ८ | १० |

पुरुष १२० व. ३९२६ मा. १० दि. १

याउपर राजा दिठोरा यास मारून मुसलमान पातशाहा झाले.

| | पुरुष | वर्षे | मास | दिवस |
|---|---|---|---|---|
| सुलतान रुकंद्दीन | १ | २३ | ९ | ० |
| ,, बाहवद्दीन | २ | २५ | ० | ० |
| ,, समसद्दीन | ३ | २९ | ४ | १२ |
| ,, कुतूमदीन | ४ | २७ | ७ | ० |
| ,, शहादीन | ५ | ० | ४ | १९ |
| बिबीनें पातशाही केली | ६ | ७ | ३ | १८ |
| सुलतान नसरदीन गोरी | ७ | १७ | ५ | २९ |
| ,, यासदीन गोरी | ८ | ७ | २ | २२ |
| ,, मोहीदीन गोरी | ९ | २३ | ७ | १२ |
| ,, हुसेन गोरी | १० | १४ | ३ | १० |
| ,, जलालदीन गोरी | ११ | १६ | ४ | ० |
| ,, फुतबदीन गोरी | १२ | १० | ९ | ० |
| ,, याकूदशहा गोरी | १३ | १३ | १० | ६ |
| ,, शहा समसीदीन गोरी | १४ | १३ | ९ | ९ |
| ,, अलाददीन गोरी | १५ | २७ | ७ | १३ |

पातशहा सेतु पावेतो कारभार फौज घेऊन गेला. समुद्रा-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पावेतों फौज जाऊन सर्व अंध होऊन बुडाली. खासा बरोबर बाबीन, काबील, दोघे सिपाई खासादेखील तिघेजण राहिले. तेथें करामती पाहून समाधी जीत घेतली. त्याच्या उपर वत्ती व पुतळे पातशहाचे आहेत. चिन्यावर पारसी लिहिले असे. हल्लीं सेतुवर पूजा व करामती चालत आहे हें सत्य असे. | | | | |
| सुलतान | कुतुबुद्दीन | १६ | ४ | ९ | १३ |
| ,, | गयासदीन गोरी | १७ | ५ | १ | ९ |
| शाहा | सरमस्त गोरी | १८ | ३७ | ९ | १३ |
| सुलनान | शहा गोरी | १९ | ३१ | ९ | १७ |
| ,, | अमीनशा बिन महंमदशहा | २० | २३ | ५ | ० |
| ,, | महंमदशहा बिन अमिनशाह | २१ | १७ | ० | ११ |
| शाहा | कुली बिन फेरोज | २२ | २२ | ७ | ९ |
| सुलतान | तगवुडी यानें जुनी दिल्ली मुस्तैद केली. हल्लीं खराब असे व सालेर व नहेरे किल्ले बांधिले. | २३ | ४६ | ४ | १२ |
| ,, | दुरुमशहा गोरी | २४ | ८ | ६ | १५ |
| ,, | महमद कुतुबुद्दीन, पातशहा | २५ | ६ | ४ | १२ |
| ,, | नसरदीन गोरी | २६ | १० | ७ | १२ |
| ,, | मचूषा | २७ | १९ | ५ | ७ |
| ,, | तोडवशा | २८ | १३ | ५ | ७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुलतान | मुबारंगशा | २९ | १७ | ७ | १३ |
| ,, | अलाउद्दीनपठाण बिन महमुंजी | ३० | १६ | ११ | ० |
| ,, | हुसेनशहा पठाण | ३१ | १५ | ११ | २७ |
| ,, | बलोलखान लोधी | ३२ | ४२ | ७ | ७ |
| शाहा | शिकंदर बिन बलोल-खान लोधी | ३३ | १९ | ७ | १३ |
| सुलतान | इभराइमशा बिन शिकंदर पातशहा | ३४ | १६ | ११ | २७ |
| ,, | सिंधु खेतरी इरामखोर | ३५ | ५ | ० | १५ |
| ,, | शाजिशा बिन मुबारंगशा | ३६ | २ | ७ | १० |
| शाह | महंमद उंजी | ३७ | ७ | ७ | १० |
| सुलतान | ब्राबरबंकस | ३८ | ० | ३ | ० |
| ,, | तेमूर चकते | ३९ | ७ | ७ | ० |
| ,, | बाबर | ४० | ४ | ९ | १५ |
| ,, | हुमाऊ | ४१ | २० | ४ | १६ |
| ,, ,, ,, | सेरशाह पठाण याणी दुसरी याणी जोरा करून हुमाऊस धुंडाउन बले पातशाही केली | ४२ | ११ | २ | १० |
| ,, | सिलीमशा बिन सेरशा | ४३ | ८ | ९ | १५ |
| ,, | फेरोज बिन सिलीनशा | ४४ | ३ | ० | ० |
| ,, | महमदखान गाजी | ४५ | ३ | २ | १८ |
| ,, | इबराहिमखान भिसंधी | ४६ | ५ | ० | ० |
| | हेमुबकाल, शिकंदर शहाचा वजीर होता त्यानें पातशाही केली | ४७ | ० | ६ | ० |
| ,, | हूमाऊ पातशहा याणी मागती जोरा करून हेमुबकाल पठाण त्यास मारून पातशाही केली. | ४८ | १० | १० | २० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ,, | आकबर कलंवी शाहागाजी | ४९ | ५१ | ९ | १५ |
| ,, | जहांगिर पातशाहा | ५० | २० | ० | ० |
| ,, | खुशरु शहरयार बिन जहांगिर | ५१ | ० | ० | १४ |
| ,, | शाहाजादा पातशा | ५२ | ३१ | १ | १४ |
| शाहा | नौरंग पातशा याचे भांडपुरुष १ दारा शेको १ शाहासुजा १ मुरादबकस १ खासा नौरंगशा. सदरहू भाऊ मारून वापास कैद करून पातशाही केली. मुदती वर्षे सन १०६८ हिजरी दस्तावर बसले. ५२ हिजरी ११२० (?) मृत्यु पावले. नौरंगशाचा जन्मकाल इ॥ शके १५३९ काल्युक्तनाम संवत्सरे सन हिजरी १०२७ ता॥ आयुष्य मुदती वर्षे ८९ शके १६२८ व्ययनाम संवत्सरे सन हिजरी १११६ अकराशें सोळा... | ५३ | ५२ | १ | ० |
| | पुरुष | ५३ | ८८३ | ६ | ९ |

नौरंगशा मृत्यु जाहला त्या नंतर धामधूम झाली. वर्षे अलीकडे शाहा किरकोळ त्याची नांवनिशी लिहिली नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय रा. ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| शके १६६० कालयुक्तनाम | | | |
| संवत्सरे पातशहा महंमदशा | ३२ | ० | ० |
| | ९१५ | ६ | ९ |

पैकीं पठाण वगैरे मुसलमान पातशा झाले वर्षे सुमारें नांवनिशी वर आहे. वर्षे ६८५. बाकी चकते पातशाही, तैमूर, बाबर, हुमाऊ, अकबर, जहांगीर, खुश्रु, शाहाजहा, नौरंगशा अलीकडचे अहमदशा वर्षे २३० म. ८, दि. ४.

**तेरीज एकंदर**

| | पु. | व. | म. | दि. |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्रराजे** | १२० | ३९२३ | १० | १ |
| **पातशा मुसलमान ता॥ नौरंगशा** | ५३ | ८८३ | ६ | ९ |
| | १७३ | ४८०७ | ४ | १० |
| **धामधूम झाली पातशा महमंदशापर्यंत** | | ३२ | ० | ० |
| | | ४८३९ | ४ | १० |

दक्षिण सुभे ६ कानगो बरू जोधपुरकर कीर्द.

नौरंगशा दक्षण तनखा नौरंगमबाद वसूली तपसील.

| | |
|---|---|
| नौरंगमबाद खोनस्ते बुनियाद | १,२३,७६,०४२ ॥≡॥। |
| सुभे वराड आलजपुर | १,१५,२३,५०८ ॥।=॥। |
| सुभे खानदेश बराणपुर आशेर | ५७,४९,८१९ ØØ॥। |
| सुभे मुहमदाबाद बेदर नांदेड | ७४,९१,८७९ ॥।०। |
| सुभे विजापुर दारु नजार | ७८,५८,५६० ॥।=। |
| सुभे भागानगर फुर खुद बुनियादी | ६,४८,६७,४८३ |
| एकंदर | १०,९८,६७,२९४ ।-॥। |

सदरहू राजे व पातशहा जाले व तनखे दक्षण सुभे वसूली तपशिल राजेश्री निराजी राहूजी हेजीबा वकील कारकिर्द राजश्री राजेस्वामी कैलासवासी थोरले ते समई रायगडाहून लेहून पाठविले जे दिल्लीची वंशावळी पाठविजे.........ते समई

मुक्काम औरंगाबाद सत्तावीस किल्ले दिधले. जाहागीर बाळापूर व अवढेप्रांत वराड वगैरे होती. ते समई समागमे मजुमुचे नि॥ जे कारकून अनाजी रंगनाथ मळकरे व येसाजी मल्हार वाईकर सुरनीवीस पातशाही दप्तरी मुत्छदी त्यास दरबार खर्च देऊन पारसीची नक्कल हिंदवी करून घेतली. रायगडास राजेश्री राजे स्वामीपासी पाठविली. त्याची तालीक रंगनाथ मळकरे त्यापासी होती. त्याचे पुत्र खंडो अनाजी मळकरे त्यापासी नक्कल होती सदरहुप्रमाणें लिहिली असे.

वंशावली मालोजी व विठोजी भोंसले यांचा मूळ पुरुष बाबाजी भोसले पाटील मौजे हिंगणी व बोरडी देऊळगांव वगैरे ता॥ पाटस प्रांत पुणें त्याचा विस्तार तपशील बाबाजी भोसले त्याचे पुत्र २

## तपशील

वडील पुत्र मालोजी भोसले त्यास पुत्र २ ता॥ वडील शहाजी राजे धाकटे सरफूजी राजे यास पुत्र त्रिंबकजी राजे त्यास पुत्र गुणाजी त्याचा वंश चंदावर प्रांती होता.

धाकटे पुत्र विठोजी भोसले त्यास पुत्र ८ खलोजी राजे, मंबाजी राजे किरकोळ ६ त्यांचीं नांवे विदित नाहीं. वडील खलोजी राजे सोनकर्ण पातशाहानी नांव ठेविले होते. दिल्लीहून सिवाजी राजे देशास पलोन गेले त्या रागें औरंगशा यानी बल करून तक्तापुढें मारिले मनसूफदार होते.

## कलम १

या उपरी गांवामध्यें मालोजी राजे व विठोजी कसबे वेरूळास नि॥ दौलताबादेस राहिले शेते करून होते. त्या उपरी त्या स्थली बायका ठेऊन चाकरीच्या उमेदवारीनें कसबे सिंधखेडास आले. राजश्री लखोजी जाधवराव देशमूख सरकार दौलताबाद व मनसुबदार नि॥ निजामशाहा पातशाहा बारा हजार घोडीयाची दौलत होती. त्यास भेटून चाकरी दरवाज्यावर भोईबारगिरी कबूल करून राहिले शरीरीं पुष्ठ होते. घोडे त्याखालीं टिकेना, त्यास्तव दारी डाहळणेस ठेविलें. पंक्तिचे भोजन वेतन दरमाहा होन प्रमाणें दर आसामीस पांच होन ५ यकून दोघास १० प्रमाणें देत होते. त्या उपरी बायकाही उभयतानी त्या स्थळी आणिल्या हे हकीकत.

## कलम २

त्याउपर त्या स्थळीं विठोजी भोसले यास पुत्र आठजण झाले. खेलाजी व मंबाजी वगैरे देखिल जाले. मालोजी भोसले त्यास पुत्र जाले नाहींत. त्याचे स्त्रीनें नवस नगराचे पिरास केला, जे, आंपल्यास पुत्र जाला तर तुमचीं नांवें ठेवीन. शहा शरफ पीर होते. त्याणी नवस पुरविला. पुत्र दोन जाले. वडील शहाजी राजे व धाकटे शरफाजी राजे भोसले. दोघे पुत्र होते. त्या मुलामध्यें उत्तम स्वरूप शहाजी त्याची वहुत होती. लखजी जाधवराऊ त्यास पुत्र नव्हता. एक कन्या जिजावा होती. शहाजी राजे यांचें उत्तम स्वरून पाहून त्यास वस्त्रें व उत्तम अलंकार केले. महालांत नेऊन खेळवूं लागले.

## कलम ३

याउपर शहाजी राजे त्यास वर्षं पाच जाली. लखोजी जाधवराऊ यास कन्या जिजाऊ तीन वर्षांची होती. शिमगा सण आला. रोस्त (?) माउले कुळ मराठे व शिपाई कचेरीस सभा केली. रागरंग कलावंत नाच मांडला. जाधवराव यानीं दोघां मुलांस मांडीवर घेऊन गुलाल वुक्का पुढें ठेऊन खेळूं लागले. कवतूक जाधवराऊ पाहूं लागले. मांडीवर मुलें दोघें आहेत, तों चित्तामध्यें उद्गार आठवून सभेमध्यें वोलिले जे, जिजाऊसारिखे रत्न कन्या स्त्रीनें पैदा केली आहे. ईस वर चित्ता योग्य शहाजी हे मूल उत्तम इजोगा होईल तर बरे आहे. स्वाभाविक सहज स्थितीनें सभेमध्यें सभानायक त्यापासीं वोलो लागले, तों पाठीसी मालोजी व विठोजी भोंसले बारगिर याणीं गोष्ठ ऐकिली. ते समई उभयता उभे राहून वोलिले. आजपासोन जाधवराव आमचे व्याही जाले. थोर लोक सभेमध्यें वोलिल्यावर मागें सरणार नाहींत. सभेमध्यें गोतगंगा सभानायक आहेत. तुम्ही समक्ष साक्ष असा. याउपरी आमचे व्याही, जिजाऊ आमची सून जाली अैसी गोष्ट नेटे वोलिले. मालोजी व विठोजी वोलोन गोही ठेउन खाली बसले; जाधवराव याणी उत्तर दिधलें नाहीं, वोलोन विचारी पडले.

## कलम ४

त्याउपरी सभा खेल जाहला, जाधवराव माहालांत गेले. शहाजीस समागमें

न्यावे ते नेले नाहीं. जिजाऊ मात्र घेऊन गेले. हें वर्तमान माहलांत बाईकास विदित जाले. लखोजी जाधव त्याशी बाईकांनीं भांडण केलें. जे, कुणबी पाटील तुमचे बारागिर देशनिकाले पोटासाठीं चाकरी कबूल करून राहिले आमचे हमतोल नव्हेत. तुम्हांस आणिखी मुलुखामध्यें सोइरे देशमुख व मनसबदार हमतोल पाहून बोलावे, त्यानीं कचेरीस गोही ठेवून गेले. तुम्हीं त्यास झाडून टाकिले नाहीं, उत्तर दिले नाहीं. ऐसी बोली बाइकानीं जाधवराव त्यासी केली. जाधवराव त्याणी उत्तर दिधले जे आम्ही स्वाभाविक बोलिलो, पाने खोबरे वाटिले नाहीं. त्यानी लबाडी केली. याउपरी यास चाकरीतून दूर करूं असे बाईकाचे समाधान केले. दुसरे दिवसी भोजनास मालोजीस व विठोजीस बोलाविले. त्यानी बोळून आणिले. तुम्ही सोइरे जालेस. आम्ही लग्न समयीं भोजनास येऊं असे उत्तर दिधले. त्याउपर जाधवराव भोजन करून कचेरीस येऊन बसले. कारकून बोलाउन हिशोब करून मालोजी व विठोजी भोसले उभयतास चाकरीतून दूर केले. तुम्ही आम्ही सोइरे नाहीत. पानें वाटिली नाहींत, गला पडता, तुफान करता, याउपरी तुम्ही येथून कबिला व मुले सहवर्तमान जाणें. येथें एक घडी न राहणें. त्याजउपरी मालोजी व विठोजी भोसले बाईकामुलें घेऊन मागती येरुळास आले. पाटलास भेटून घर व शेत पूर्वीचे मागती करू लागले.

## कलम ५

त्याउपरी शेतें २–३ वर्षे केली. त्यांची स्थिती, पहिले पासून स्नानें केलीया वाचोन व श्री शिवलिंग पूजा व बेलपत्री सांगपूजा केल्यावाचोन अन्न घेणें नाहीं. व ईकादशी, सोमवार, प्रदोष व ब्राह्मणाचें तीर्थ घेतल्यावाचून अन्न घेणें नाहीं. पुरातन दंडक होता. त्याउपरी शेतामध्यें उभयता भाऊ राखन मालीयावर होते. माघ मासी शुद्ध पक्ष चांदणें पौर्णिमेचे होतें. मध्यें वारुळ एक होतें. श्री भवानी प्रसन्न जाली. हात १ चुड्यासहवर्तमान निघोन मालोजी जागत होता त्यास पालविले. वीज झमकती ऐसे दृष्टीस पडले. त्याउपरी विठोजीस निद्रा लागली निद्रेमध्यें होता. जागे करून दृष्टांत सांगितला. त्यानें दृष्टांत लटका केला. तुम्हास झोपेनें घेरलें. तुम्ही निद्रा करणें मी जागत बसतो. त्याउपर मालोजीस निद्रा

लागली. निद्रेमध्यें श्री भवानीं येऊन शुभ्र पातळ भर कुंकू मोती व अलंकार युक्त उभी राहोन पाठीवर हानोन जागें केलें. उठ उठ, जागा होई. तुजला मी प्रसन्न जाले. या वारुळांत सर्प आहे. ते स्वरुप माझे, त्यास नमस्कार करून वारुळ खणून सात कढया माल घेणें. सर्प जाईल त्याचे वाटेस न जाणें. तुम्हास सत्तावीस पिढ्या राज्य दिधले प्रसन्न जाले हे आभय आहे. जे चित्ती धराल ते होईल हे आभय आहे श्री भवानीनें दिधले.

## कलम ६

त्याउपर हे स्वप्न भाऊ **विठोजीस** श्रुत केले, माल उकरून सात कढया माल रातोरात गावांत गाडीयावर घालून परसांत पेव खणून पुरून ठेविला. त्याउपर शेत-पोत विल्हे सगला लावून बायका व मुलें तेथें गुप्त ठेउन कसबे **श्री**गोंदे उर्फ **चां**भार-गोंदे यास आले. तेथील सावकार पुरातन **शे**षापा **ना**ईक **पुं**ड लक्षापती होता. त्याची जाऊन भेट उभयतांनीं घेतली. पहिला दंडक होता. त्यामुळें त्यास भेटून एकांती सर्व वर्तमान इस्तकबीन ता. सांगितलें. त्याज उपरी आमचे मनोरथ पूर्ण करणें त्याणी कबूल केले. उभयतास बहूत आदर करून वचन मागितलें, जे तुम्हास राज्यपद जाले तर आम्हास काय द्याल.? त्याणीं पोतदारी वतन कबूल करून पत्र करून दिधले. हे शफुत व सनद करून दिधली. याउपर त्यास अभ्यंक करून उत्तम अलंकार वस्त्र देऊन गाडीवर वसवून कारवान बाहेर राहिले होते. हजार घोडीं उत्तम कारवानापासून खरीद केली. बारगीर व खासदार व जीनखोगीर सीले व पाखरा उत्तम जीन सामान तयार केला. डेरे पालख्या तयार करोन व **ज**गपाळ **निं**बाळकर **फु**लटणकर बारा हजार फौज त्याजपासी पुंडावे करोन मध्येंच होते. त्याजकडे हजीब पाठवून कौल आणून त्यास जाऊन भेटले. मुद्दा कुल जाहीर केलें, जे आपल्या समागमें दोन हजार स्वार उत्तम देणें. आम्हापासीं हजार एकूण तीन हजार फौजनिशी सडे जाऊन **ल**खोजी **जा**धवराव **सिं**दखेडकर. त्यासी दावा सोगा-ईचा करून तुम्हीं मदत करणें, त्याणी कबूल करून फौज दोन हजार समागमें दिधली. उभयतां पाटील हजार येकून तीन हजार स्वार उत्तम भले सिपाई स्वार होऊन सोगाईचा दावा करावयास गेले.

ग्रा. नं.
ता.

## कलम ७.

त्याउपरीं जगपाळ निंबाळकर त्याची फौज घेऊन श्रीगोंदे येथें येऊन डेरा-दांडा ठेउन सडे तीन हजार फौजेनिशी निवेंदेऱ्हारे घाट उतरून नेवासे यांजवरून गंगातीरास आले. सीकार केली. डुकरे दोन मारून समागमें रातोरात घेऊन रोजे निसबत दौलताबाद तेथें मसीदीमध्यें मेले डुकर दोन टाकिले. त्याच्या गळा चिठ्या निजामशा पातशाहा त्यास अर्ज लिहिली. जे, लखोजी जाधवराव देशमुख प्रो माा त्याची कन्या जिजाऊ आमचे पुत्रास शाहाजीस देऊं केली. सिमगा पोस्त हजर मजलसीमध्यें बोलिले. त्या उपर बायकाचे बोलें बेमानी करून आम्हास चाकरीतून रुसकत करून कविलेसुद्धां बाहेर घातले. यास्तव आपण व जगपाळ निंबाळकर याचा आसरा करून मसीदीमध्यें डुकर मारला. याउपर पातशाहा आमची दाद देतील, सोगाई आमची आम्हास देववितील, तर उत्तम आहे. नाहींतर जेथवर पातशाहीमध्यें तुमच्या मसीदी तेथें डुकर मारून अशा चिठ्या लिहून डुकर टाकू(न) रातोरात माघारे गंगा उतरून फुलटण देशास व जंगपाळ निंबाळकर त्यापासी आले. प्रातःकाळी मुनावर मसीदीमध्यें निमाज पढावयास गेले तो डुकर दोन गला चिठ्या पाहिल्या. बहुत कष्टी होऊन डुकर उचलोन दौलताबादेस पातशाहा होते, तक्ती बसले होते, ते समई पुढें आणून टाकिले. चिठ्या पातशहानीं वाचून पाहिल्या. बहुत क्रोधायमान जाहले. लखोजी जाधवराव देशमुख त्यास तलब स्वार आबादी पाठविले. जाधवराव जेवीत होते ते समई तलब पोहोचली. जेविता ते समई द्वाही देऊन तैसेच उठविले. तेच क्षणीं पुढें घालून दौलताबादेस आणिले. पातशहाचे भेटीस जाऊन कुर्नीस केली. उभे राहिले. पातशाहा बहूत क्रोधायमान होऊन चिठ्या पुढे टाकिल्या. डुकरे दोन दाखविले. पातशहा बोलिले, जे, आणिक कोणी उमराव असता तर हत्तीखालीं घालून मारून टाकिला आसता. याउपर विठोजी व मालोजी भोसले त्याचे पुत्रास शाहाजीस जिजाऊ देऊन लग्न करणें, त्याचें समाधान करणें, या गोष्टीस ढील केली तर त्याणी आणिक दावा केला तर तुमचा मुलाहिजा होणार नाहीं, असे पात-शाहानीं ताकीद केली. जाधवराव बहूत घाबरे होऊन आर्जे केला.

## कलम ८.

याउपर लुखजी जाधवराव देशमुख याणी आर्जं पातशाहास केला, जे, पातशाहा आभय देतील शिरी हात ठेवितील, तर आर्जं करीन. त्यावर पातशाहानीं आभय दिल्हे, जे, जो मुद्दा तुमचा आसेल तो कवूल केला, त्यावरून कुरनिशाती करून आर्जं केला, जे, मालोजी व विठोजी त्याचा पुत्र शाहाजीस आपली कन्या जिजाउ पातशहाचे हुकूमावरून आपण देतो. असी यासी पातशाहा मेहेरवान होऊन त्यास यकयेकास तिघास मनसफु दौलत बारा हजार घोडीयाची आपल्या ब्रावर देऊन त्यास कौल देऊन पातशहानीं शर्फराज केले पाहिजे. त्याचे अर्जावरून पातशहा मेहेरवान जाले. दौलतमनसफु कवूल केली. कौल तयार करूल भले माणूस पातशाहानी व जाधवराव त्याणी पाठवून मालोजी व विठोजी व शाहाजी वर देखिले. दौलतावादेस आणून भले माणूस जाधवराव सामोरे जाउन आहेर घेऊन आले. पातशाहाची मुलाकत जाली. शाहाजी वर सुरतवंत पाहून पातशाहा खुशवंत जाले.

## कलम ९.

त्या उपरी पातशहा मेहेरबान होउन सिरपाव हत्ती व घोडे व दौलत बारा हजार घोडीयांची तिघाजणास देउन सरफुराज केली. ज्याप्रमाणें जाधवराव त्यांची दौलत त्याहून विशेष दौलत दिधली. पातशाहानी जाधवराव त्यास हुकूम केला जे कबीला देखील जिजाउ नवरी सिंधखेडाहून दौलतावादेस घेउन येणें, येथें आपले रुबरु लग्न करूं. त्याजवरून तमाम लग्न जाधवराव याणी आणून लग्न सिद्धी पातशहा खुद्द उभे राहून दौलतावादेस केले. मालोजी व विठोजी यानी कबिला कसबे येरुळाहून आणिला. लग्न जाले. दौलत जाली. मालोजी राजे यांचे दिवाण कदीम आउजी गोविंद हणमंते पेशवे आरंभापासून होते. ते जिजाउचे नग जतन करावयास जामदार आण्णा (?) गोमाजी नाईक पा. संवाल जाधवराव त्याणी दिधले होते.

## कलम १०

त्याउपरी सेतामधील द्रव्य होतें ते काढून धर्म केला. श्री घ्रषणेश्वराचें देवालय व शिवालय तीर्थ विस्तीर्ण बांधले, व श्री महादेव तेथील तळें मालोजी भोंसले त्याणी बांधले. ठाईठाई विहीर व बाग केले. द्रव्याचा धर्म केला. कीर्ति केली.

वा. नं.
ता. १९

## कलम ११

त्याउपरी विसापंचविसा वर्षांची उंवर शाहाजी राजे भोसले त्यांस जाली. जिजाउन(स) पुत्र प्रथम संभाजी राजे जाले होते. त्यासमई बहिरट(?)निजामशाहा पातशाहा शांत अपमृत्यु जाला. पातशाहास पुत्र दोघे लाहाण मुले साता आठ वर्षांची होती. वायका मुलाच्या आया होत्या. सावाजी आनंत ब्राह्मण मुछदी (मुत्सद्दी) थोर आकलवंत होता. त्यास बोलावून बायकांनीं पुसीले, जे, पातशाहीस वजीर दिवाण पाहिजे. बंदोबस्तीस आकलवंत मोहरा पाहाणें; त्याजवरून सावाजी आनंत याणी पाहतां शाहाजी राजे भोसले सुरत ल्याख (लायक) देखणे, आकलवंत व सिपाहि असे जाणून बायकाचे माहालांत घेऊन गेले. हा मोहरा दिवाण वजीरी ल्याख आहे असा अर्ज सावाजीपंतीं केला. त्याजवरून बायकाचेहि चित्तास आले. मूल दोघे पातशहाचे मांडीवर बसविले. सिरपाव दिधला. पातशहाची मुले तक्तावर घेऊन शाहाजी राजे भोसले बसो लागले. खालेते वजीर जाधवराव वगैरे लोक मुजरा करूं लागले असा कारभार केला.

## कलम १२

त्याउपर लखोजी जाधवराव देशमुख ह्यांस बहूत चित्तामधी दुःख वाटलें. जे, कुणबी पाटील देशनिकाले आमचे घरी येऊन भोयवारगीर अन्न भक्षून जोरावारीनें दावा करून सोयरीक केली. पातशहाची मुले घेऊन तक्तावर बसतात. आम्ही खाले उभे राहून मुजरा करावा हे उत्तम नाहीं. चितामधीं दुःख जालें. त्याउपर मनसुवा करून दिल्लीस शाहाजा पातशाहापाशीं कावल (निरोप) व आर्जी पाठवून मीर जुमला सुभा साठीं हजार फौज उत्तरेहून आली. जाधवराव वगैरे सरदार पुढें जाऊन नरमदातीरीं भेटी होऊन हरोल (फितूर) जाधवराव होऊन दौलताबादेवरी चाल केली.

## कलम १३

याउपर शाहाजीराजे याणी पातशाही नस...व वायकासमवेत किल्ले माहूलीनजीक कल्याण भिवंडी कोंकणांत थोर क़िल्ला पाहून कांहीं फौज घेऊन कविलासमवेत तेथें गेले. लखोजी जाधवराव ह्याणी मोंगलाची फौज उत्तरेकडून घेऊन पाठलाग करून माहुलीस जाऊन फौजसहवर्तमान वेढा साहा महिने घातला. भांडत होते.

## कलम १४.

त्यांउपर शाहाजी राजे माहुलीस भांडत असतां पातशा विजापूरचे त्यास अर्ज वकील पाठविले, जे, आपणावर मोहीम दिल्लीचे पातशहाची झाली. लखोजी जाधवराव याणी हरोलीकरून फौज घेऊन आले. घरचा फितवा. आपण किल्ला माहुली बळकाउन बसलो. पातशाहा कौल पाठवितील, दौलत मनसवी विशेष देतील तर आपण फौज सहवर्तमान चाकरीस येऊ, असे अर्जी पाठविली. त्यावरून पातशाहा विजापूरचे मुरार जगदेऊ दिवाण पातशाही त्याणी कौल व ईमान पाठविले. त्यावरुन शहाजी राजे पांच हजार फौजेसहवर्तमान सासरे जाधवराव त्याचा मोरचा रात्रीं मारून रातोरात जिजाउ व पुत्र संभाजी राजे देखील विजापूरचें रोखे चालिले, जिजाऊ गरोदर सात मासाची शिवाजी राजे याचे वेळेस होती. दोन तीन कोस जाता मार्गी घोडीवर होती. जिजाउ अडली. पळवेनासे जाले. शहाजी राजे यास संकट जाले. तेव्हां शंभर स्वार जिजाऊपाशीं ठेऊन संभाजी राजे वडील पुत्रास घेऊन पळाले. मार्गी जिजाउस टाकून पळता शाहाजी राजे जिजाउस बोलीले, जे, तुमचे पिते आमचे मागे पाठिलाग करून येतात. त्यास शरम असती तर सोडून हे तीस पळवितील. आम्हास तुमची गरज नाहीं असें बोलोन शहाजी राजे पलोन गेले.

## कलम १५.

त्याउपरी लखजी जाधवराव याणी रात्री तेच क्षणी तांब्रास (मोंगलास?) सावध करून महतापाहतीवर घेऊन हरोल होऊन पाठीलाग केला. तो मार्गी जिजाऊ उभी राहिली. सिपाई जाधवराव त्याचे त्याणी वोळखिली. जाधवराव बाप भेटले. समागमें लोकांनीं फजीत जाधवराव यास केले. जे, जिजाऊ तुमची कन्या व गरोदर तांब्रास जाहीर जाले तर उत्तम नाहीं. दावेदार तुमचे निघोन गेले. इस कन्येस वाटेवेगळे काहाडणें. जिजाऊ सांगाते पांचशें स्वार देऊन रातोरात किले शिवनेरी निजामशाही किला शाहाजी राजे त्याजकडे होता तेथें जिजाऊस नेऊन घातली, सिवनेरी गडावर श्री भवानी सीवाई तीस नवस जिजाऊने केला जे आपणास पुत्र जाला तरी तुझे नांव ठेविन. त्याउपर शिवाजी राजे त्याचा जन्म जाला शक १५४९ पंधराशे येकून पन्नास क्षयनाम संवत्सरे.

५३५५

### कलम १६

त्याउपर ते समई लखोजी जाधवराव तांब्राची फौज नगरपावेतों पाठिलाग केला. परंतु शाहाजीराजे झाडून विज्यापुरास गेले. पातशहास जाऊन मुलाजमंत केली. मुरार जगदेव दिवाण प्रतिनिधी त्याणी आदर पुढें सामोरें येऊन पातशाही भेटी सुलतान सिकंदर त्याची झाली. बहूत सन्मान केला. वस्त्रें व घोडे व हस्ती व सिरपाव देऊन बाराहजार घोडीयाची दौलत जाली. जाहागीर कर्नाटक देशी जाली. त्याउपर लुखजी जाधवराव व मीर जुमला सुभा साठीं हजार फौज माघारे दिल्लीस गेली. जाधवराव नर्मदापावेतों जाऊन शरमंडली दक्षणची रुमसत होऊन कसबे सिंदखेडास दाखल जाले.

### कलम १७

त्याउपर माहुलीस पातशाही नसल व बायका घेऊन साबाजी अनंत मुछदी घेऊन किले दौलताबादेस मागती दाखल जाले. दिवाण वजीरी नाहीं यास्तव शोध करिता मलिकंबर किंगसखान विजयापुरकर वजीर क्रमले. मलीकंबर हुसदी याणी फकीरी घेऊन मकेस जाता दौलताबादेस दुकानी झोळी टांगून उताणे मेंडीस पाय टाकून निद्रा केली होती, तों साबाजी अनंत पालखीत बसोन बाजारातून जाता मलीकंबर याजवर नजर पडतांच चिन्हें उत्तम देखिली. पाई पद्मे, शामवर्ण हपसी फकीर नेकजात देखिला. सेवक पाठवून जागे करून घरास आपल्या नेले. अभ्यंग उत्तम करून, भोजन उत्तम करून, वस्त्रें उत्तम देऊन येकांती भाषण जाले आणि शफत जाली. बायकाचे भेटीस घेऊन गेले. पातशहाची मुले मांडिवर बसविली. तक्तावर मुले पातशहाची घेऊन बसले. शहरांत द्वाही फिरविली. कुल उमराव देखील जाधवराव येऊन मुलाकत जाली. पातशहाची बंदोबस्ती केली त्यावर मीर्जुमला सुभा दिलीहून मागती फौज आली. त्या फौजेशी बऱ्हाणपुरानजीक आशेर तेथें भांडण जाले. दिलीची फौज मारून माघारी नर्मदापार केली. मलीकंबर यास फार जखमा लागल्या. फत्ते करून दौलताबादेस आले. मलीकंबर त्याच्या सिक्यातील नांव पारसी बंदे दरगाहा यकानीं मलीकंबर चिंगसखानी हे मुद्रा याप्रमाणें होती.

### कलम १८

त्याउपर मलीकंबर फौज घेउन विजयापूर प्रांती श्री. माहादेव वलवसवड पावेतो

येऊन बहूत धामधूम केली. साठ हजार फौज होती. त्याउपरी **मुरार जगदेव** **शाहाजीराजे** व **सरज्याखान** थोरले व **रणदुल्लाखान** व तमाम वजीरासमवेत अैशी हजार फौज मऱ्हाटे व दक्षणी व पटे वसीले समेत गाढी फौज त्याणी **मलीकंबराचा** मुकाबला केला. **मलीकंबर** याचा मोड जाला. पळतां **भीमातीरास** मौजे **कोरेगांव** जि॥ **तळेगाव ढंमढेरे** यांचे येथें आले. **भीमेस** बहूत पूर. भाद्रपद मास. **मलीकंबरास** संकट जालें. ते समई घोड्याखाली उतरून **भीमेस** नमस्कार केला. तो **भीमा** दोन भाग जाली. कुल लष्कर उतरून पार गेले. मागून आपण स्वार होऊन पैल तिरास जाता **भीमा** मागती पूर चालली. त्याजवर **मुरार जगदेव** फौजसह वर्तमान येतांच **भीमा** बहूत पूर देखोन कौतुक वाटले. **मलीकंबरास** सांगून पाठविले जे तुमचे पाठीवर यावे तर श्री **भीमेनें** मार्ग तुम्हास दिधला. पैलतिरी तुम्ही उभे राहाणे आम्ही दुरून कुरनीस करू. त्याजवर **मलीकंबर** उभे राहिले. समस्तानी मुजरे केले. × × × × त्यावर **मलीकंबर दौलताबादेस** गेले.

## कलम १९

याउपरी **मुरार जगदेव** कुल फौजसहवर्तमान **नागरगाव** ता॥ **सांडस खुर्द** जि॥ **पुणे भीमा ईंद्रायणी** संगम दक्षणवाहीनी तेथे मुक्काम केला. फत्ते जाहली. ते समई शके १५५५ श्रीमुखनाम संवत्सरे दक्षाणायने वर्षाऋतु भाद्रपद आमावासिया सूर्यग्रहण सोमवती थोर पर्व देखोन **तुळापुरास** चोवीस तुळा केल्या. शेवटीं हत्ती × × × छावा होता त्याची तुळा करावयास हुकूम समस्त वजीरास जाला. **सरजाखान रणदुल्लाखान** वगैरे कोण्हाची नजर चालेनाशी जाली. ते समई **शाहाजीराजे** याणी विनंती केली, जे, तुम्ही स्नानसंध्या करणें आपण हत्तीची तुळा करतो. त्याउपरी **शाहाजीराजे** याणें संगमा खालता **भीमेस** डोहो होता. तेथे मोठी नाव रिकामी घालून नावेस खूण करून तक्ते देऊन हत्तीस नावेंत घातला. ते खुण नावेस करून हत्ती नावेतून काढिला. नावेंत दगड लोखंड घालून हत्तीच्या खुणेपावेतो आणून आभांड बांधले. मग दगड लोखंड काढुन तुळा करून वजनी सोने घालून ब्राम्हणास धर्म केला. त्या समई मौजे **नागरगाव** मोडून मौजे **तुळापूर** नाव ठेविले. ब्राम्हणांस अग्रहर दिधले. अद्याप गाव दुतर्फा माहाराष्ट्र व तांम्र कुल बाब वतन चालत आहे. शके १२१६(?) खरनाम संवत्सरे माघ मास ते समई **चाकण** किल्ला पक्का आरंभला.

तयार होता. रवहपसी त्याणे केला. ते समई मलेकरी निमाजगांव मसीद बांधली ते समई मुकपा (?) नवे जाले.

## कलम २०

त्याजउपरी कसवे पुणें येथें मोरो तानदेव होनप देशपांडे भुमेगिरी करीत [×× ×××××××××× ×] उत्तम वस मोठे होते. त्यापूर्वी चाणकेस बरारब हपसी त्यानें किल्ला पक्का बांधोन मुलुक आमदानगरापासोन तहद वाई, सिरवल, इंदापूर देखील मुळुक मारून पुंडाई करीत असता बरारब शांत झाला. निजामशाहा त्याकडे किला होता. त्याउपरी शाहाजीराजे दिवाण जाले. याउपरी किला त्याजकडे जाला. मधे हलमाजी जाली. त्ये समई मोरो तानदेव होनप देशपांडे जि॥ पुणे पुंड जाले. त्याउपरी रायराव दिवाण नि॥ मुरार जगदेव याणी स्वारी करून पाळत लाउन राणातून धरून आणिले. नखी सुया टोंचून मार देऊन कैदेत होते. कसबा पुण्याचा कोट पाडून शहर मारून नागर पाढरीवर धरीला. श्री भुलेश्वरगड बांधला. त्याचे नाव दौलत मंगळ ठेविले. मुळुक वैरान बहूत जाला. ते समई शाहाजीराजे याणे तुला हत्तीची केली ते समई मेहेरबान होउन उतरपती कुल मुळुक प्रांत जुन्नर चाकण किला व पुणे तहद वाई सीरवळ सुपे इंदापूर हा प्रांत जहागीर दरोबस्त दिधली.ते समई शाहाजी राजे याणी दादो कोंडदेव कुळकर्णी मौजे मळठण ता॥पाटस प्रांत पुणे लिहीणार हिमानी (इमानी) जाणून त्यांचे स्वाधीन मुळुक कुळ येखत्यारी (अखतारी) देऊन ठेविले. पागाहजार सरदार मुक्तसर सिदी हिलाल हपसी तैनाती केले. त्याउपरी मुरार जगदेव विजापूरास गेले. त्या समागमें शाहाजीराजे गेले. दादाजी कोंडदेव त्याचे स्वाधीन मुळुक केले. ते समई सांगितले, जे, चिरंजीव व स्त्री जुन्नरी आहेत. त्यास आपल्यापाशी आणून माहाल बांधून उभयतास अन्नवस्त्र देऊन चिरंजीवास शहाणे करणें, हे आज्ञा करून शाहाजीराजे विजापुरास गेले. दादाजीपंती शिवनेरीहून जिजाऊ व शिवबास आणून पुणें वसउन लाल माहल बांधून उभयतास वरे इज्जतीने ठेविली. वस्त्रे अलंकार उत्तम करून आपल्या संन्निध ठेविलें. त्याउपरी मोरो तानदेव कैदेतून पळोन मौजे मलकर प्रांत चाकण येथें रंगनाथभट कुळकर्णी व जोसी त्याची मातुश्री फुलाईआवा त्याचे घरास रात्री

पलोन गेलें. त्याणी माडीवर गुप्त ठेविले. सा (सहा) मास तेथें होते. कोणास विदित नाहीं अैसे होते.

## कलम २१

त्याउपर शाहजीराजे विजापूर प्रांती कलगिरी पाळे तेथें पाळेगार मवास होता. किल्यास वेढा घातला होता. वडील पुत्र संभाजीराजे त्यास गोळा लागोन शांत जाले. त्याचा पुत्र उमाजी राजे स्त्री मकूबाई जितीकर. त्यावरी पाळेगार धरून किल्ला फत्ते केला. त्याउपर राजे जाधवराव त्याच्या दाव्यामुळें दुसरे लग्न केले. तुकाबाई मोहित्याची कन्या स्त्री दुसरी केली. तीस पुत्र येकाजी राजे जाले. जिजाऊ शिवाजीराजे त्याचा त्याग केला. मुख पाहणे नाहीं. दादाजीपंत पुण्यामध्यें मर्यादीनें जिजाउचे चालवीत होते. सिउवास शहाणे केले. घोडे फिरविणें ऐसे तरी (?) होते केली. दादापंती मोरो तानदेव यास कौल देऊन ज्या स्थळी होते तेथून आणिले. मुलुक कुल आवाद केला. चोर नाहींसे केले. मवस मारिले. चार लांडगे बारा वाट्या नाहींसे केले. आदळ इनसाफ बहूत होत. जोतंसुली (?) दिल्हे. कसबा खेडबेरे त्या स्थली सीवापूर पेठ वसविली. वागाई, आंबराई वगैरे झाडेही इरसाल महाराज शाहजीराजे त्याचे नावे केला. आंबा घेतला म्हणून आपला हस्त तोडींत होते. मग लोकांनी आर्ज करून आस्तनी कडी केली. हे वर्तमान शाहाजीराजे त्यांस विदित जाले. सिरपाव पाठविला. ते समई कडी आस्तनी दुसरी केली. यानंतर सातसे होन पाठविले. मुशारा त्याखेरीज जे मीलाले ते पडले पान दिवाणांत जमा. ऐसा बहुत दिवस कारभार केला. शाहाजीराजे विजापूर प्रांती होते ते समई मुरार जगदेव दिवाण प्रतिनिधी होते. पातशाहा सुलतान शिकंदर शांत जाले. मागे पातशाई नसल व मुले होती. बायकानी व बेगम होती तिणें मुरार जगदेव त्यास मजुरी-यास बोलाउन तक्तापुढें जीवे मारावे. ते समई कारंजे हाउद होता. ते समई स्नान करून आतुर संन्यास सिखा उपटून संन्याशी जाले. त्याउपर हातपाय चौरंग करून मारिले. त्याउपर विजापूराहून वजीर बरा सरज्याखान, वगैरे भुकाम भातोडीस तळें फोडून मलीकनें फौज धाडिली. बरावजीर धरून पाडाव केले. सिरपावे देऊन सोडिले.

## कलम २२

त्याउपर विजापुरचा वंद तुटला. शाहजी राजे फौजेसहवर्तमान कर्नाटक वालापूर कोल्हापूर प्रांतीं होते. वरावर फौज वारा हजार होती. ते समई चंदावर तेथें पालेगार विजय राघव थोर राजा होता. त्याच्या स्त्रिया पांचशें होत्या. मधेरेचा (मदुरेचा) राजा त्रिचनापलीकर यासी भांडण निरंतर होते. यासी मदत शाहाजी राजे जाऊन चंदावरी युद्ध वहुत जाले. विजयराघव रती युद्ध करता समरंगणीं क्रमला. ते समई किला चंदावर स्थळ वलें घेतले. वहूत द्रव्य सांपडले. राज्यकुरु घेतले. त्रिचनापल्लीकर त्यासी राज्य घेऊन ध्यावे असा तह ईमान होते. त्यासी वेमानी करून त्यास मारून बाहेर घातले, आपण राज्य घेतले. त्या स्थली पुत्र तुकाईचे पोटीचे येकाजीराजे त्याची स्त्री दीपाबाई उभयतां तेथें ठेऊन आपण वालापूर व कोल्हापूर प्रांतीं माहाराज गड तेथें होते. येकाजी राजे त्यास पुत्र तीधे. १ शाहाजी राजे, १ शरफाजी राजे, १ तुकोजी राजे. तुकोजी राजे त्याची संतती हाली असे. सदरहूप्रमाणें येकाची संतती असे.

## कलम २३

त्याउपर मलीकंबर दौलताबादेस होते शांत जाले. साबाजी अनंत मृत पावले. दिलीचा पातशाहा शाहाजादा त्याणी फौज मिरजुमला त्यासमागमे औरंगजबास देऊन दौलतावाद घेतली. खडकी मलीकंबर त्याणी वसविली होती. ते पेठेस कौल देऊन गावकुसू पक्के वांधून औरंगजब त्याणी आपले नांव देऊन औरंगाबाद नांव ठेविले. दक्षिणेस सुभा करून विजापूरप्रांतें मोहिम केली. युद्ध तुंबल गुडगीस जाले. दक्षणी सरज्याखान वगैरे त्याणी औरंगजेबास मागे सारिले. फिरून औरंगाबादेस माघारे आले. बऱ्हाणपूर खानदेश व आलापूर वराड खोनस्ते बुनीयाद औरंगाबादेती सुभे तेथील कारभार करून होते.

## कलम २४

त्याउपर दादाजी कोंडदेव त्याणी बंदोबस्त कारभार यखत्यारीचा केला. त्यांचा मृत्यु जाला. तेसमई सोला सतरा वर्षाचे शिवाजीराजे होते. त्यानी बहूत शोक दादाजीपंत क्रमले म्हणोन केला. त्याउपरी खजीना बहूत होता. ते समई शाहाजी

राजे दूर चंदावर प्रांती गेले होते. त्याणी दादाजीपंतास सांगोंन पाठविले, जे, विजापूरप्रांतीं येऊन ते समई खजीना आम्हाकडून पाठविने. तुम्ही आपल्यापाशी ठेवणे. त्यास दादाजीपंत मरतांच खजीना जप्त शिवाजीराजे यानी केला. पागा हजार कुलमता जप्त केली. सिदी हिलालहसदी त्यास आज्ञा दिधली. हजूर पाठविले. पंचवीस हजार मावले चाकर नवे ठेविले. कुल प्रगण्याची बंदोबस्ती केली. शामराज निळकंठ पारसनीस चतुर सुरत उत्तम त्यास पेशवाई सांगितली. राघो वलाल आ.ो चिटणीस लिहीणार हजूर ठेविले. रघुनाथ बलाल लस्करचे सवनिस केले. सिपाई आंगे बहूत होते. नवे लोक सही केले. पुण्यामध्यें होते. शाहाजीराजे त्यास विदित जाले, जे, दादाजी कोंडदेव शांत जाले. पुत्रानें आटोप केला. हे विदीत जाले. पुत्रास समाधानें लेहून सनदा त्याचे नावें पाठविल्या. सिवाजीराजे पुण्यांत होते.

## कलम २५

त्याउपर औरंगजेब त्याचा व सिवाजी राजे याचा दावा लागला व यास मुळ, जे शाहाज्यादा पातसहा दिल्लीची पातशाही करीत असता बेगम कन्या औरंगशाहाची भगिनी येकोदर होती, तीसी वलात्कार केला. बहिणीनें भावास सांगोन पाठविले, जे, पातशाहीची नजर फिरली. तुम्ही चाल करून पातशाही घेणें. त्यावरून दक्षिणचा खजिना तीन वर्षें हजूर दिल्लीस पाठविला नाहीं. खजीना खर्च करून सीलबंदी फौजेसही केली. तमाम लोकास कौल पाठविले.

ते समई सिवाजी राजे यास परवाना पाठविला. पुण्यामध्यें सिवाजी राजे याणी मनास आणिले तेथें मजकूर जो तुम्ही फौज देखील येणें. आगर तुम्ही येत नाही तर शामराव निलकंठ दिवाण त्याजबरोवर लाटी (?) फौज देऊन पाठविणे. दिल्लीची पातशाही आपणास आली म्हणजे दौलत मनसफा बापासारिखे देउ. ऐसा परवाना पाठविला. त्यास सिवाजी राजे म्हणो लागले, जे तुरकास सलाम करणें उत्तम नाहीं. सामराजपंतही पाठवीत नाहीं. परवाना श्वानाचे शेपटी बांधोन गावांत फिरविला. आवदी त्यास धके देऊन बाहेर घातले. त्याणी जाऊन औरंजेबास सांगितले. तेची गांठ चित्तात बसली, जे दिल्ली फत्ते जाल्यावर दक्षिणेस मोहीम आधी शिवाजीवर करून तधी पासोन दावा आजपावेतो चालीला.

## कलम २६.

त्यासमई औरंगजेब दिल्लीस जाउन युद्ध केले. उदाराम देशमुख प्रांत माहोरचा तो पडला. त्याची स्त्री रायबागीण तिनें युद्ध केले. फत्ते जाली, माहोरप्रांत सरकार जाहगीर व देशमुखी परवाना करून दिधले. दाराशाहा व शाहासुज्या व मुरादवक्स तिघे भाऊ मारून बाप शाहाजादा त्यास कैद करून डोळे सिवले. कैदेमधे मेले. बहिणीने दिल्लीचे तक्त किल्ला भावाचे स्वाधीन करून औरंगशाहा पातशाहा जाले. ग्वाही फिरली.

## कलम २७

त्याउपर तेसमई सिवाजीराजे याणी पत्र निळोजी नीळकंठराव नाईकवाडी किले पुरंदर निजामशाही किला बळकाउन भोवंताला मुलुक तेथील खंडणी घेत होते. इनामगांव होते. गावोगाव हक्क दस्तुरी घेत होते. शाहाजीराजे याचा भाऊपणा बहुत होता. त्याजबद्दल शिवाजीराजे याणी पत्र लिर्हाले, जे, दादाजीपंत वडीलासमान होते त्यास मृत्त जाला. आपणास आसिरा नाहीं. गडाचे माचीस गडाखालीं येऊन त्यानी उत्तर दिधले, जे, दुसरा विचार नाहीं. तुम्ही अगत्य आले पाहिजे, त्याचे उत्तर येतांच गडाखालीं जाऊन छावणी पागा व पंचवीस हजार मावळे जाऊन राहिले. पाउसाळा तेथें क्रमला..

## कलम २८

याउपर दिपावली सण आला. निळोजी निळकंठराव त्यास भाऊ धाकटे पिलाजी निळकंठराव, संकराजी निकळंठराव ऐसे तिघे भाउ होते. वडील भाउ निळोजी कुल किल्याचा व गावगन्ना कारभार करीत होते. धाकट्या भावास वाटा वडील देत नव्हेत. अन्नवस्त्र मात्र देऊन येके स्थली होते. धाकट्या भावाचें मनोगत येकांती भेट सिवाजीराजे याजकडे अनुसंधान लाविले होते. त्यास दीपावली सणाबद्दल जिजाउ व सिवबास सांगावें म्हणून धाकटे भावास वडिलानी धाडिले. गडावर आणून दीपावलीचा सण करावा. त्यास भाउ धाकटे गडाखाले येऊन आवताणें सांगो लागले. त्यास सिवाजीराजे याणीं आनमान केला. जे, उत्तर दिधले. आपणास उभयेतास लोकांस टाकून येता नये. येथें तुमचेच आहे. भावास

फिराउन धाडिले. आवतणे घेतले नाहीं. मागती तिघा भावानीं विचार केला, जे, शाहजीराजे त्याचा शब्द लागेल. भाउपणा पुरातन. त्याची स्त्री जिजाउ व पुत्र असता दिपवालीस नेली नाहीं. यास्तव मागती जाणून उभयतास मातुश्री जिजाउ व सिवबा समेत लोक बारगीर व मावळे बरोबर खास सरदारकुळ लोक एकंदर परवानगी देऊन गडावर समस्तास आणिले पाहिजे. भाऊ येऊन समस्तास गडावर घेऊन गेले. तीन दिवस न्हाण व भोजन व उत्तम वस्त्रे उभयतास व लोकास प्रतिपदेस देऊन भाऊंबीज करून बोळवन करावी. प्रतिपदेस भोजन जाली. रात्रीं जागरण जाले, निळकंठराव स्त्रीसहवर्तमान निद्रा केली. प्रांतः-काल चार घटका रात्री असता पिलाजी नीलकंठराव व शंकराजी निळकंठराव उभयतानी राजे यास सावध करून निळोजी निळकंठराव याचे पलंगाखाले रेशमी काढण्या घालून बांधले. त्याचे स्त्रीस काकीस येकीकडे काहाडून बाजेवर बांधले. पाई बेडी घातली. ते समई त्याचे भाऊ उभयेता तेही पाही शृंखला घालून खोली-मध्यें ठेवून गडाचे दरवाजे लोक मावळे पाठवून, जागा चौकीया पाठवून त्याचे लोक मावळे पाठवून स्त्रिया देऊन गडाखाले घातले. वस्तभाव घेऊन सोडिली. गड फत्ते केला. खर्जाना वीत सापडले. निळकंठभाऊदेखील तीन दिवस कैदेत होते. तिसरे दिवशीं सोडिले. गडाखाली हीनाम (इनाम) कांहीं देऊन ठेविले. अद्याप नाईकवाडी वतन आहे व इनाम आहेत.

## कलम २९

याउपर चाकण किला तेथें ठाणे दादाजीपंतांचे होते. तेथें फिरंगोजी नरसाळा हवलदार ठेवून किला आपले स्वाधीन केला. त्याउपर राजगड व पद्मावती व संजीवनी व सुवेळा एकुण राजगडचे इमारतीवर नारो त्रिंबक पिंगळे प्रथम चाकरीस ठेविले. सिंव्हगड व तोरणा व प्रचंडगड घेतला. त्याउपर रायगड वसविला. ईमारतीं करून खासे राजे तेथें मुख्य स्थळ केलें. बेरामावळ तेथील चंदाराव मोरे जाऊनकार (जावळीकर) राजे विजयापूरचे पातशाहास नालबंदी वर्पास देत होते. त्याचा दिवाण हणमंतराव मोरे कुल कारभार चाळीस हजार मावळे त्याचा सरदार जोवर नजीक श्री माभळेश्वर, तेथें राहत होता. चंदाराव मोरे त्याच्या कन्या सुंदर उपवर नवऱ्या होत्या. सोहीरीकीवद्दल रघुनाथ वलाळ सबनवीस यास हणमंतराव मोरे त्याजकडे

सीष्टाईस पाठविले. झाडी वहूत त्या रानात. रघुनाथ बल्लाल पंचवीस स्वार व शंभर मावळे घेऊन गेले. हणमंतराव मोरे भेटीस आंगणांत जोते उतरून आले. भेटी होतांच दंगा करून कटारीनें, तरवारीनें मारिलें. द्वारी दाहा लोक होते. तेही मारून वाईवरून रातोरात पुरंधरास राजे याजपासी आले. वहूत समाधान पावले. दुसरे दिवसीं खुद. राजे व मावळे चाळीस हजार घेऊन रात्रीं चालले. तिसरे रोजीं श्री माभळेस्वराहून निशाणीचा घांट उतरून जाउलीस गेले. रघुनाथ बल्लाळ सबनवीस त्यासमागमे फौज देऊन रडतोंडीच्या घाटे ते तिकडून आले. जाऊलीस वेढा घातला. दोनप्रहर पावेतो भांडण जाले. गाव घेतला. बाजीराव व कृष्णराव व राजे व मोरे पंधरा सोला वर्षाची उंवर होती त्यास स्त्रिया देखील कैद केले. मता द्रव्य वहूत. पुरातन राज्यभंग केला. मता नेऊन प्रतापगड घाट माथा कीला वस्ती केली. मावळे ठेऊन चंदाराव घेऊन पुण्यासी आले.

## कलम ३०

याउपर बाजीराव व कृष्णराव मोरे त्यास अभ्यंग करून उत्तम भोजन घालून पुणीयाचे दक्षिण भागीं निमाजगा त्या स्थलीं शिरच्छेद केला. त्याच्या स्त्रिया कन्या नवऱ्या होत्या. आपण सोयरीकी केली नाहीं. सोडून दिधली. चंदाराव मोरे जावलीकर यांचे राज्ये या प्रकारे घेतले. साठी हजार मावले नवे जुने सही केले.

## कलम ३१

याउपर विजयापुरचे पातशहास जाहीर जाले. शाहाजीराजे कर्नाटकांत होते त्यास लिहीले. त्यानी उत्तर लिहीले. जे, आपली स्त्री व पुत्र त्याचा त्याग केला. तुम्हास कळेल ते करणे आमचे कांहीं ऐकत नाहीं.

याउपर आवदुलाखान भटारी पाहिले होते. वजीर होता. बारा हजार फौज त्याची होती. दुष्ट तुलजापुर ज्याणें श्री भवानीस उपद्रव केला होता त्यानें पैजेचा विडा घेऊन फौज घेऊन वाईस आला. सिवाजी राजे व जिजाउस घेऊन प्रतापगडास आले. साठी हजार मावले होते. आबदुलाखानानें आपला खुद दिवाण कृष्णाजी भास्कर शिवाजी राजे त्याजकंडेस सिष्टाईस पाठविले, जे, तुम्ही येऊन भेटी घेऊन जाणे. तुम्हास दौलत शाहाजी परीस देऊन पातशाहास भेटउन...भेटी

घेणें. त्यास कृष्णाजी भास्कर त्यास उत्तर दिधले जे आपले भेटी घेऊन परतुन लष्करांत येणें नाहीं. प्रतापगडच्या दरवजीयाखालीं बाहेर येथें सदर करून खुद आवदुलाखान व तुम्ही येऊन रुवरु येऊन वचन प्रमाण करून हाती धरून घेऊन जाणे. पातशाहाची भेटी घेऊन तुम्हास करणें ते करावे. आपण कांहीं लष्करांत अगर बाहीर येथून येणें नाहीं. भेटीस खानास आणिले तर उभयता येणे. आपले तर्फेने वकील दत्ताजी गोपीनाथ बोकील मौजे हिवरे नजीक सासवड त्यास पाठविले. उभयतां खानापासी वाईस येऊन हांकीकत जाहीर केली. वहू ताथातेनें समजाऊन सांगितले. त्याउपर प्रतापगडास जावे भेटी घ्यावी ऐसा निश्चय जाला.

## कलम ३२

त्याउपर; दत्ताजीपंती राजे यास सांगोन पाठविले कीं भेटीस खान येतो. ती भेटीची तुम्ही सरंजामी करणें. त्यावरून सिवाजी राजे त्यानी गडाच्या संन्निध किल्ल्याच्या बुरुंजाखाली दरवजीया सन्निध सदर केली. मखमली डेरे, चंदाराई कलस, सोन्याचे, व बिछाने तयार केले. त्या खटपटीस अनाजी रंगनाथ मलेकर होता. राजेस्वामीनी ब्राह्मण बोलावून द्रव्य दिधले, कीं, काशीस य गयेस जाऊन उत्तरकार्य करणें. धर्म हस्तके गोदान देखील दिल्हे. दाढी लाहन छाटून टाकली. जिजाऊ रडो लागली. तीस समीप येऊं दिले नाही. साठी हजार मावळे त्यास जागोजाग नाके तेथे ठेविले. गडावर तोफा तयार केल्या. जे घटकेस आपण खानास मारू ते समई गडकरी अवाज करतील, वाद्य होतील, ते समई लस्कर कुल वुडवणें हे सरंजामी केली, त्याउपरी आवदुलाखान याणी कुल तोफा व बुणगे वाईस ठेवून खंडाजी खोपडा रोहिंडकर मावले पाच हजार घेऊन हरोल होता, त्यास घेऊन प्रतापगडाचे रोखे चालता, हत्ती निशाणाचा चालेनासा जाला. बहुत केली. खानास वर्जीले. परंतु ऐकिले नाही. हत्तीचे डोळे फोडून, दुसरे हत्तीवर निषाण घेऊन चालिला. तळे घाटे वेधोन वेलदार झाडे तोडावयास घातले होते. रडतोंडीच्या घाटे उतरून पाराजवल काहीना ( कोयना ) तीरीं खारीमध्यें लस्कर उतरले. जाली झाडे तोडावी तेव्हां राहावे. ऐसे करून लस्कर उतरले.

क्रा. ३।८।८९१
नो. ७।११।१३



## कलम ३३

त्याउपर मागती रदबदलीस कृष्णाजी भास्कर दिवाण व पंताजी गोपिनाथ पाठविले. ज्या उपर तरी लष्करांत अगर लष्करावरोबर येऊन भेटी घेणे. त्यानी जाऊन सांगतो असे दोन चार वेला गेले आले परंतु राजे याची यक गोष्ट हटे नीम्रहे ऐकून खान स्वार जाले. पुत्रास फाजीलखानास येऊन पालखीत बसून बत्तीस भोई होते. अंगेहि भारी जोरावर होता. समागमें खिजमतगार पाचजणे व कारकून कृष्णाजी भास्कर दिवाण दत्ताजीपंत हेजीव नि॥ राजे ऐसे पर्वत वेंधून सदरे संनिध आले. हे देखोन अगोदर राजे याणे सदरे मागे गर्तामाची खाणून ठेविली. त्यामध्यें धारकरी चालीस जणे संभाजी काउजी बंदा व हिरोजी फर्जंद व सोनमाहाला जीवमाहाले वगैरे चालीसजण होते.

## कलम ३४

त्याउपर सिवाजीराजे याणी अंगें चिलखत, त्यावरी बखतर, डोईस टोप डावे हातीं विचवा, आस्तानींत नवसाकी पटा ऐशा मजबुदीनें गडावर खबरदारी करून तमाम लोकास सावध करून उतरले. सदरे संनिध आले. पूर्वेकडून खान येताच पालखीखालीं उतरले. तीराचे खासेतून पाई चालत आले. भोई व खिजमतगार मागें दूर ठेउन खान व कृष्णाजी भास्कर दिवाण उभयता सदर वेंधोन लोडाजवळ आले. दत्ताजी गोपीनाथ पुढें येऊन राजे यास विनंती केली, जे, खानास जाऊन भेटणें. त्यास पुसोन तीन वेला खान हेच ऐसे खरे केले. खानाचे क्षेम कृष्णाजी भास्कर यास पुसिले, जे, सिवाजी हेच तीन वेला खरे केले. त्यास ते समई उभयतांच्या नजरा एक जाल्या. सिवाजी राजे संनिध येऊन पोटांत डोई घातली. खानानें पोटी कवळून धरीले. तेच क्षणीं चपलाई करून विचवा डावे हाती होता हृदयाखाली पोटी मारिला. पोटला येकचे घाई अताडी बाहरी आली. खान कृष्णाजीपंतास म्हणो लागले जे आपणास मारिले. ते समई कृष्णाजी भास्कर याणी तरवार फिरंग होती त्याणे सिवाजी राजे याजवर टाकिली. परंतु कारेगार जाला नाहीं. दुसरीयाने राजे याणीं पटीयाचा वार खानावर टाकिला. दोन भाग शरीर होऊन पुरा होउन खाले पडिला. कृष्णाजी भास्करास म्हणो लागले, जे, ब्राम्हणास मारीत नाहीं. पळोन जाणे. कृष्णाजीपंती भोईयास हाका मारून खिजमतगार पांच

व भोई बत्तीस येऊन पालखींत मुडदा घालून जात असता सदरेमागे गारीत, संभाजी व कांउजी बंदे जीवमाहाले वगैरे चाळीसजण धारकरी येऊन भोयाच्या पया केल्या. भोई व खिजमतगार जीवें मारिलें. ते समई दत्ताजी गोपीनाथ हेजीव सांपडले यास वार जाले. लोकानी वोलखीले नाहीं. सिवाजी राजे याणी दत्ताजी-पंतास रक्षिले व कृष्णाजी भास्कर यासही मारू दिधले नाहीं. त्यास मार्ग दिधला. लष्करांत सांगण्यास मावारा जीव घेऊन गेला.

## कलम ३५

त्याउपर पालखी सभेत मुडदा खानाचा गडावर आणिला. तुळजापुरास उपद्रव श्रीभवानीस केला म्हणून ××× मेख लोखंडाची तावून सीर दरवाजीयावर बांधले, तोफा सुटल्या. वाद्यें वाजली. ते समई मावले जाऊन नाके रडतोंडी घाट धरून कुल फौजे बुडविली. बारा हजार घोडे हत्ती दरोवस्त घेतले. वाईस जाऊन कुल लष्कर व बुणगे व तोफाखाना दरोवस्त गडावर नेल्या. फत्ते जाली. ते समईंच खंडोजी खोपडा धरून जीवे मारीला. मातुश्री जिजाऊस येऊन भेटले. दत्ताजी गोपीनाथ बोकील त्यास ईनाम मौजे हिवरे दिधले. रोख दोन लक्ष बक्षीस केले. मुलास त्याच्या अद्याप अन्न आहे. इनामगावीं सुखी आहेत शके १५७५ विक्रती-नाम संवत्सरे. आबाडुल्लाखान मारिला.

## घलम ३६

त्याउपर तेसमईंच येउन सातारा व चंदनवंदन वगैरे गड व विशालगड व पनाला व कुलगड व पारगड व भीवगड सदरसोध अैसी गड घेऊन सीवाजी राजे पनालीयावर गेले. नेतोजी पालेकर सेनापती सरनोबत केले. कान्हा मोर देउ गपचुप मजमदार केले. पागा त्याच्या स्वाधीन केली. पन्हाळा खुद राहिले.

## कलम ३७

याउपर फाजीलखान अवदुलाखानचा लेक जखमी होऊन फकीर होऊन विजापुरास गेला. पातशाहापासी जाउन डोईस टोपी घातली. जे; आपले वापाचा सूड घेणें. त्याउपर पातशाहानी कुल सरदार त्यास ताकीद केली, जे, मोहीम सिवाजीवर करणें. त्यावरून ऐसी हजार फौज कुल उमराव घेऊन फाजीलखान पन्हालीयास येउन वेढा घातला.

## कलम ३८

याउपर वेढियांत सिवाजीराजे, साठ हजार मावळे, व नेताजी पालकर सरनौबत होते. साहा महिने वेढा होता, खाले येऊन अंगे रात्री मोर्चा मारून वरते गडावर जात असेत. कोणी येके दिवसी नेताजी पालकर याचा मेहूणा रात्री मोर्चा मारावयास गैरहजीर राहिला. हे वर्तमान राजे यास विदित जाले. ते समई रागास येऊन गैरहजेरी जागा एक महिन्याचा करू लागले. ते समई नेताजी पालकर याणी सक्त रदबदली केली म्हणून राजे स्वामीनीं नेताजी पालेगार यजवर इतराज होऊन दूर केले. लाडतोजी गुजर होते, त्याचे नांव प्रतापराव ठेऊन सरनौबत्ती दिधली, ऐसी नित्य भांडण होत असे. पावनगडीखालीं डोंगर होता त्यावर तोफा जोडून मार करू लागले. गोले गडावर येऊं लागले. ते समई हवालदार व लोकांणीं अर्ज केला, कीं साहेबी येथून जाणे म्हणजे वेढा उठोन जाईल. बाहिरून उपराळा होईल. हे मसलत ऐकोन राजे तयार होऊन वीस हजार मावळे गडावर ठेउन चाळीस हजार मावळे बराबर घेऊन मोरचा रात्री मारून चालिले.

## कलम ३९

त्याउपरी विशालगडच्या मार्गे पाई चालता चार कोसावर उरला तो प्रात:काल जाला. फौज रातोरात चंद्रज्योती लाऊन मार्ग काढीत फौज पाठीवर कुल लागली. ते समई बाजी प्रभू देश कुलकर्णी हीरडेस मावलकर धारकरी राजे यास म्हणो लागले, कीं तुम्ही निमे लोक घेऊन गडावर जाताच तोफाचे आवाज करणें. तों पावेतों या खिंडीमध्यें आपण निम्मे मावले घेऊन दोन प्रहर पावेतों पाठीवर फौज येऊ देत नाहीं. साहीबी निघोन जाणे. आपण साहेब कामावर मरतो. पुढें मुले लेकरास अन्न देणें. असे म्हणोन बाजी परभू उभे राहून राजे यास वाटे लाविले. तो फौज फाजीलखान व सरज्याखान कुल सरदार येउन खिंडी संनिध भांडो लागले. वीस हजार मावले बाजी परभू यानी बहुत युद्ध केलें. प्रहर दीड प्रहर पावेतों फौज खिंड चढो दिधली नाहीं. तों राजे गडावर जाऊन तोफ मोठी सोडली. आवाज दोन तीन करतां बाजी परभू म्हणो लागले जे याउपर जीव गेला तरी कांहीं धोका नाहीं. त्याउपर फौजेतून प्यादे कानडे मागून आले त्यानी मोड केला. मावले खिंडीतून मारून काढिले. पळो लागले. ते समई बाजी परभू उभे राहून भांडण झालें.

बाजी परभूस जखमा जोरावर लागल्या. त्या स्थळी पडले. पडता मावले कांहीं मेले, कांहीं डोंगरात सांभाळून पळाले. फौज गडाखालीं गोणीमुठ तेथें प्रहर पावेतों उभे राहिले. त्या स्थली पाणी नाहीं. कोंकण कुबल जागा देखोन या उपर सिवाजी सापडत नाहीं. येथें अगर पनाला राहिला. फौजेवर छापा घालून बुडविलें. हा विचार करून माघार फौज कुल घेऊन विजापुरास वेढा काढून गेलें.

## कलम ४०

त्याउपर तधी पासून परभूवर मेहेरवान जाले. त्याचे पुत्रास बाबाजी बाजी परभू जमिनीविस सेनापतीची वतनी धंदा सांगितला. गडावर कुल कारखानीसी वतन कुल परभूस जाले. फत्ती जालीं. त्याउपरी राजे किले पुरंधरास आले. शामराव नीलकंठ × × × शांत जाले. राजगडाचा इमारतीवर मोरो त्रिबंक पिंगळे होते त्यास पेशावाई चौकस पाहून सांगितली.

## कलम ४१

त्याउपरी तेच समई निलो सोनदेव मजमदार जाले. सोनाजीपंत याचे पुत्र त्रिबक सोनदेव डबीर जाले. आपाजी दंतो सुरनिवीस जाले. दत्ताजीपंत वाकनीस जाले. असे अष्टप्रधान केले. त्याउपरी दिल्लीची मोहिम औरंगशाहा तक्ती बसल्या उपरी दोनतीन वर्षे तिकडे बंदोबस्तीस लागले. तों इकडे शिवाजी राजे याणी गड व फौज व बारा मावळे देखील बलाविले. राज्यो जोरावर जाले. हे वर्तमान दिल्लीस औरंगशाहास खबर जाली. औरंगाबादेस रक्षण मोहोकमसिंग रजपूत होता. त्यास हुकूम जाला, जे शिवाजीवर मोहीम करणें. त्यावरून मोहोकमासिंग रजपूत दहाहजार फौजनिसी नगर आलीकडे चालोन आला. त्यावर फौज प्रतापगड गुजर सरनौबत वीस हजार फौज पाठविली. युद्ध जाले. मोहोकमसिंग रजपूत रणी पडला. फौज कुल प्रथम बुडविली. फत्ते जाली. दहाहजार घोडे घेतले.

## कलम ४२

त्याउपरी राजे राजगडास जाऊन लग्न केले. तिघी स्त्रीया केल्या. त्यास्थली राहून कोंकणातील किल्ले समुद्रातील बेटे होती ती बांधली. सुवर्णदुर्ग व कुलाबा व सिंधदुर्ग व विजयदुर्ग किल्ले बांधून राजापुरी भोवताले कुलकिले वगैरे करून

आरमार सजून दर्यासारंग त्याचे स्वाधीन आरमारे केली. हपसी व फिरंगी इंग्रेज तमाम जेर केले. कोकण तमाम कल्याण भिवंडी पासून तहद बांदेजोड प्रांत गोवे सरद सीधे तळकोंकण कावीज केलें. तमाम ठाणी बसविली.

## कलम ४३

याउपरी औरंगशाहा याची मोहाकमसिंग वुडाल्यावर शास्ताखान मामा खुद ऐशी हजार फौज त्याचे तैनातीस करून रजपूत जैसिग मीरजाराजा तमाम बवोशी सुभा कुल येकतारी देउन दक्षिणे मोहीम सिवाजीवर केली. प्रथम वेढा चाकणेवर येऊन खुदानी नव महिने बसोन मोरचे भवताले वसले. फिरंगोजी नरसाला हवालदार बहूत भांडला. इशानकोनचा वुरुज सुरुंग लावून उडविला. त्यापरी किला जेर जाला. किला घेऊन फिरंगोजी नरसाला शास्ताखानास भेटला. मनसफत देत होता. कबूल केले नाहीं. राजेस्वामीस येऊन भेटला. राजेस्वामीनीं नवे जुने कीले भुपालगीचा हवाला फिरंगोजी नरसालीयांस सांगितला. बाबाजीराम होनाप देशपांडीये पुणेकर आगोधर पुढें बऱ्हाणपुरा जील्हा भेटिला होता. त्याजउपर संभाजी काउजी वंदा त्याजवर इतराजी जाली. परिखा होउन शास्ताखानास भेटला. जोरावर होता. घोडा चौपाई धरून उचालिला. त्याजवरून मेहेरवान जाले. मनसफन जाले. मौजे मलकर तेथें गाव बलकट करून तेथें पाहून पाचशे स्वारानिशी होता. त्याउपरी राजेस्वामिनी फौज पाठवून टाणे मारून संभाजी काउजी वंदा युद्ध करिता पडला. त्याउपर शास्ताखान चाकण घेऊन छावणीस बायकापुत्रासह वर्तमान कसवे पुणें येथें लाल माहाल राजेस्वामीचा तेथें येउन फौजेसहवर्तमान राहिला. बावाजीराम यास मनसफ होती. मेहेरबान त्याजवर होती. शके १५७९ मन्मथनाम संवत्सरे वैशाख वद्य १० इंदुवासर मौजे मलकरी नेताजी पालेकरी सर नौबत फौजसह वर्समान येउन संभाजी काउजी मारिला. व गाव जाळीला. तधीपासून गाव खराव आसे.

## कलम ४४

या उपरी शास्ताखान सिवाजी राजे त्यास पत्र पंडितास बसऊन लिहीले होते सिलोक लेहून पाठविले.

'वानरस्त्वं वनेवासी पर्वतास्ते सदाश्रयाः ।
वज्रपाणिरहं साक्षात् शास्ताखान उपागतः ॥

कलम ४५

यांचे प्रत्योतर राजे स्वामीने पाठविले.

पराजिग्ये वज्रपाणिं शिवोयो लंकानाथं वानरः श्री हनूमान् ।
तयोराघवद्वर्णशाली नृपोहं शीघ्रं शास्ताखान जेताल्येयं ॥

याउपर सिवाजीराजे राजगडाहून कुल मावळे जमा करून माळी पुणेकर फुलहार नित्य शास्ताखानास देत होता. त्याचा मेव्हणा राजापाशीं होता. त्याचे हते भेद केला. त्यास पाचसे होन देऊं केले. लालमाहाल तेथें खिडकी होती बागेमध्यें जावयाची. त्या स्थळीं घर माळयाचे होते. राजगडीहून चाळीस हजार मावळे व पांच हजार फौज उत्तररात्री आंबिलआवल तेथें स्वार घोडी ठेऊन आंबराईतून पायी मावले जागा जागा ठेऊन माळी समागमे घेऊन खिडकी समीप खुद राजे आले. भाद्रपदमास, पावसला, कालोखी रात्र, ते समई गावकुसु खिडकी उघडून लाल महालांत गेले. चौकीस खोजा हीलाल देउन पंचवीस माणसें घेऊन चौकीस जागत होता. पांच हजार मावले धारकरी घेऊन खोजा मारिला. माणसें मारिली. तेच माहालांत खोली पुत्राची माळ्यानें दाखविली. शास्ता खानाचा जेष्ट पुत्र निद्रीत ज्वान स्त्रीसहवर्तमान होता. तेथें जाऊन पुत्रास एक्याच घाई पव्याचे पलंगावर खुद्द राजियानें मारून, सहलीस एक चाबुकानीं मारतांच तिनें सांगितलें जे खानाचा पुत्र रात्रीं माळयानें चुकून खोली पुत्राची दाखविली. त्याच सेजारीं खोलीमध्यें शास्ताखान धुंद होता. तिकडे राजे जातांच शास्ताखान सावध होऊन शारसुवीची भिंत उडोन गेले. सिताबी करून वार केला. अंगठा उडोन पडला तेच खबरदारी चहुकडे जाली. वादाने आवाज चहुकडे आले. तेच राजे फिरले. थोरला दरवाजा तिकडे हत्तीवर चंद्रजोती लाउन तयार जाले. मावले लोकांनीं सोंडा हत्तीच्या तोडून खीडकी बाहेर निघाले. घोडीयावर स्वार होऊन रातोरात माघारे राजगडास प्रातः काल होताच दाखल जाले. तोफा तयार केल्या.

## कलम ४७

याउपर तेच रात्री लष्करसह वर्तमान हिलाल लाऊन पावसामध्यें शास्ताखान पुत्राचे शोकास्तव पाठलाग करून रायगडाखाली फौज घेऊन येउन उभे राहिला. तो अंबारीस गोळा लागोन अंबारी उडाली. हत्ती मागी स्वार त्यास गोला लागला. शास्ताखान याणी जागा कुबल पाहिली. मुकाम करावा तरी पाऊस फार. डोंगर भवताले. सिवाजी आपणास मारील. फौज घेउन पुणीयास दाखल माघारे जाले.

## कलम ४८

त्याउपर पाऊसाला जाला, कार्तिक मासी मागती गडावर मोहीम करावी तो दिल्लीस पातशहास खबरवाले दाखल जाले. जे, सिवाजीनी छापा शास्ताखानावर घातला. पुत्र मारिला, अंगठा तोडिला. त्याजवरून इतराजे होउन सुभा तगीर होऊन सुभा तगीर केला. हुजूर बोलाविले. मिर्जाराजा त्यास सुभा जाला. वस्त्रे सिरपाव जाला. सनद जाली. तेनातेस दिल्हे. दीलेलखान जाले.

## कलम ४९

त्याउपरी मिरजाराजा किले कोंढाणा सिंहगडास वेढा घातला. राजे राजगडाहून उपरात्र मावळे पाठवून मोरचे रात्रीस यऊन मारीत आसते. जेकीरा जो पाहिजे तो पाठवीत आसत. त्याउपर प्रतापराव गुजर सर नौबत यासी करार करून मुलामाणसाचे चालवावे शफत करून लष्करांत मिरजा राजे याचे पाठविले. शिपाईचा धड बेरोजगारी होती. कटारी मजुरीयास नित्य जाता कोणे एके दिवसी संधी पाहून संध्याकाळीं मजुरा होऊन महालात जाता कोणासी पाहून प्रतापराव यांणी कटारी काढून मिरजा राजा त्यास मारावे. आपन मरावे. निदान कबूल केलें. संन्निध येतांच सेवक कोणी देखिले तेव्हां धरून मार बहूत दिधला. ते समई कबूल जाले. जे सिवाजी राजे याणी तुम्हास मारावे, आपन मरावे. उदार जीव करून लस्करांत आलों. आमचे हाते तुम्हास मृत्यु नव्हता, हे उत्तर दिल्हे. त्यावरून मिरजा राजा मेहेरबान जाले, सीरपाव उत्तम व घोडा उत्तम देऊन प्रतापराव गुजर त्यास सोडले. रायगडास राजेस्वामीस येऊन भेटले. कृपाळीं जाले. वक्षीस सीरपाव दिधला. समाधान पावले.

## कलम ५०

त्याउपर सिवजी राजे याणी किला पुरंधरास येऊन पेडगावी येऊन रसद व लमाण वगैरे रहदारी येत होती ते मारिली. हे वर्तमान मिरज्या राजा त्यास विदीत जाले. सिंव्हगडाचा वेढा काढून किले पुरंधरास येऊन दिले-खान पठाण दरोबस्त येऊन बसले. रुद्रमाल खालीं डोंगर होता. त्यावरी धमधमे रचून तोफा गडावर गोळे येत आसेत. मोरचे नारायण पेठेकडून चालीले. खालते येऊन मोर्चे मारून जात. केदार दरवाजीयाकडून जकिरा व लोक साठी हजार मावळे व सिवाजी राजे खुद नित्य भांडत त्याउपर मिरजा राजा याणें हेजीब पाठवून भेटीचा मार मांडिला. सिवजी राजे यानेहि चित्तांत आणून भेटीचा तह केला. गडाखालीं येऊन मावले समागमें घेऊन भेट घेतली. मिरजा राजानें सामोर येऊन भेट जाली. हत्ती घोडे सीरपाव जाम आलंकार उत्तम देऊन वचन प्रमाण जाले. पातशाहाचे भेटीस दिल्लीस जावे. मिरजा राजा त्याचा पुत्र रामसिंगास समागमें यावें. सिवजी राजे व संभाजी राजे उभयता दिल्लीस जावे असा तह जाला.

## कलम ५१

ते उपरी रायगडी जिजाऊ व राजाराम त्यापासी मोरोपंत पेशवे व निलो सोनदेव मुजुमदार व आनाजी दत्तो सुरनवीस व सरदार व पागा ठेऊन निर्वणुक करून दिल्लीस चालिले. पाच हजार पागा व प्रतापराव गुजर सरनौबत व निराजी राउजी हेजीब त्रिंबकपंत डबीर, रघुनाथपंत कोरडे व हिरोजी फर्जे व मावले पांच हजार इतका समुदाव घेऊन दिल्लीला समागमे मिरजा राजा त्याचा लेक रामसिंग हजार स्वारानिसी समागमे होते. मजल दरमजल चालिले. मिरजा राजा औरंगाबादेस गेले.

## कलम ५२

ह्या उपर भेटीस उभयता सिवाजी राजे संभाजी राजे व मुत्छदी घेऊन भेटीस पातशहाचे गेले. अगोदर रामसिंगानें व निराजीपंती मजुऱ्याचीं राहारवेश उभे राहून करावा हे पढविले होते, भेटीस तक्तापुढें सनिध जाताच सलाम न करता राहीमखान दिवान त्याचे वरते जाऊन पिते व पुत्र उभयतां उभे राहिले. खुनेनें

रामसिंगानें सांगितलें. परंतु सलाम न करता मनामध्ये तुरकास सलाम करणे उचीत नाही. पातशाहानी सिवाजीस पाहून रुमाल तोंडास लाऊन हंसो लागले. रामसिंगाकडे पाहिले. रामसिंगानें समजाऊन सांगितले, जे मऱ्हाठे यास राहार वेश ठाऊकी नाहीं. तेंच क्षणीं रामसिंगास आज्ञा केली, जे घेऊन उभयतास जाणें. जाते समई मजुरा केला नाहीं. पाठी पातशाकडे करून चालिले. लस्करांत आपल्या डेऱ्यांत आले.

## कलम ५३

त्याउपरी दुसरे दिवशीं रामसिंग यास बोलाऊन पातशाहानें पुसिले कीं तुम्ही जाऊन सिवजीस पुसणे जामीन देणें, मनसफु देउ, नाहीं तर पुत्रास येथें ठेवावे. त्यास आज्ञा देऊन त्यास रामसिंगानें उत्तर दिधले, जे, त्यास पुसोन उत्तर देऊ. त्याउपर रामसिंग सिवजीकडे येऊन विचार पुसिला. रामसिंग म्हणो लागले, जे, आपण जामीन तुम्हास होत नाहीं. राजे त्यानींही सांगितलें, जे, तुम्ही जामीन न होणें. आम्ही पुत्रास ठेवीत नाहीं. उभयतां येथें राहतो. ऐसे उत्तर दिधले. याचा विचार मनास आणून पातशाहास जाहीर केला. पातशाहानें हुकूम केला, जे उत्तम, हावेली किल्यासमीप पाहून देणें. येथें येऊन राहातील. हुकूम होतांच उभयता मुछदी दरोबस्त शाहरात जाउन राहिले. तेच समई चौकीदार दाहा हाजार तोफाची हजारी येउन पातशाही तोफखाना येऊन चौकी बसली. सिवाजी राजे याणी रामसिंग यास आणून फजित केले. इमानी रजपूत. इमान तुमचे आमचे जाले ते उजवले. जे जाले ते बरेच उत्तम जाले. पातशाहास आर्जे तुम्हीं करून प्रतापराव गुजर व पागा व मावळे लोक वगैरे देशास जातील. पातशाही दस्तक वाटेनें करून देणे. आम्ही उभयता पातशाही कैदेंत आहों. वरकडास जाऊन देणे आम्ही उभयता आहो. त्यावरून आर्जे पातशाहास रामसिंगानें केला. दस्तक करून दिले. प्रतापराव गुजर व पागा व मावळे वगैरे लोक देशास वाटेस लाविले. दोन पालख्या, दोन घोडे उत्तम व खिजमतगार व निराजीपंत व त्रिंबकपंत व रघुनाथपंत कोरडे व हिराजी फर्जंद इतके राहिले. वरकड कुल वाटे लाविले.

## कलम ५४

त्याउपर पातशाहाची भेटी नाहीं. कैदेंत होते परंतु इज्जतीनें होते. नित्य मेवे, डाल्या, काहर पाठवून समागमे निराजीपंत व रोहिलाखान वगैरे मुछदी कुल त्यास मेवा पाठवीत होते. त्याकडूनही मेवा येत आसेत. ऐसी नित्य खुशामती मांडली. एक दोन वेळ झाडा घेतला. मग झाडा घेणें राहिले. ऐसे दोन मास डाल्या नित्य येऊं लागल्या. तों कोणे एके दिवसी चार घटिका दिवस असतां उभयता पिते व पुत्र डोलींत बसून दिल्लीबाहेर कुंभार देशींचा इमानी होता ×× अगोदर हिरोजी फरजंद जाऊन इमान त्याचे घेतलें होतें. त्या स्थळीं जाऊन उभयता परसांत मोठी हवेली त्याची होती तेथें गुप्त राहिले. इकडे मागें उभयता जातेसमई हिरोजी फर्जंद पलंगावर चिरा व तुरा मोत्याचा घालून निद्रा केली. झरोखा त्यावाटे राखणदार पाहात असत. त्याउपरी दोन घटिका जाली. उपर संध्याकाळ समय हिरोजीनें चिरा व तुरा पलंगावर ठेवून बाहेर निघाले. निराजीपंत अगोदर सावध होते. हिरोजी ×× दिसेनासा जाला. ते समई राखणदार पाहो लागले तो पलंगावर चिरा व तुरा राहिला होता. हाक जाली. पातशाहास खबर जाली. चौकीदारास मार कैद जाली. त्र्यंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे यांचें बिराड वेगळे होतें. उभयता मात्र सांपडले. त्यास मात्र कैदेंत ठेविले. वरकड अवघे गेले.

## कलम ५५

त्याउपर कुंभाराचे घरीं एक मास गुप्त होते. चहूंकडे वाटेनें दौड फौजा गेल्या. कोठें वाटेस शुद्धी नाहीं. शाहरांत दौंडीही पिटली. फौजा माघाऱ्या आल्या. शांत जाले. त्याउपरी दाढ्या बोडून बैरागी वेश घेतला. निराजीपंतास बैरागी भाषा येत होती. त्यांस महंतपण देऊन सर्व मंडली बाहेर उत्तर मानस, वाराणसी, व प्रयाग, व गया सर्व यात्रा करून देवगंडाच्या मार्गें चापे प्रांताहून गंगा इंदूर प्रांती उतरून कढेवलीप्रांतात आले, तों अगोधर फौज आनंदराव व तेलंगराव त्यांची फौज येऊन गुरे तमाम त्या गांवची नेली होती. त्याच गावी हे झुंड गावांत गेली. एक पाटलीन, तिचे घरास जाता जाता तीस म्हणो लागले, जे, बाई स्थळ द्याल तर राहूं. ते म्हणो लागली जे, गोठा खालीं पडला. सिवाजीच्या स्वारांनीं गुरें तमाम नेली. सिवाजी

कैदेंत दिल्लीस पडला होता तैसीच पडो. नाना प्रकारें सिव्या देऊ लागली. निराजीपंताकडे पाहून हसो लागले. तिचे नांव गांव लिहून घेतले. त्या उपरी त्याच वेषें भीमा उतरून स्वराज्यात आले. याच वेषें येऊन रायगडास दरवाजीयास दाखल झालें. जिजाऊस खबर केली, जे बैरागी झुंड उत्तरेकडून आली आहे. हे वर्तमान ऐकताच परवानगी झाली. जिजाऊचे दर्शनास बैरागी वेषें गेले. निराजीपंती आशिर्वाद केला. सिवजी राजे याणी मातुश्रीस जाऊन पाई डोई ठेवली. मातुश्रीनें वोलखिले नाहींत. राजे जाऊन मांडीवर बसले. डोईची टोपी काहाडली. तेव्हां वोलखिले. ते समई आनंद जाला. वस्त्रें भूषणें डोईचे टेक पाहून दिधली. धर्म केला. तोफा वाये जाली. समाधान सर्वास जाले.

## कलम ५६.

त्या उपर संभाजी राजे श्रीकाशीमध्यें नानाजी विश्वासराव ब्राह्मण थोर होते त्याचे घरी ठेविले होते. वाटेस चालवेना म्हणोन ठेविले होते. दुसरे वेळेस पोहा आला ते समई घेऊन रायगडास आले. त्यास बकसीस नानाजी विश्वासराव, त्यांस दिधले. दोन लाख देऊन आनंद जाला. जिजाउ उपवास करीत होती. त्याउपर पारणें केले. धर्म बहूत केला.

## कलम ५७.

त्या उपर डबीर त्र्यंबकपंत व रघुनाथपंत कोरडे त्यास कैदेंत होती. ते दिल्लीस पातशाहनी सिरेपाव देऊन सोडले. तेही मागाहून आले. राजे स्वामीनीं प्रतापराव यास व निराजीपंत व त्र्यंबकपंत व रघुनाथपंत कोरडे व हिरोजी फर्जंद त्यास बकसीस बहूत दिधली.

## कलम ५८.

त्या उपरी मिरजाराजा त्याजवर पातशाहा इतराज जाले; जे सिवाजीस पळविले. हा अन्याय ठेऊन सुभा तगीर केला. हुजूर वोलविले. मिरजा हुजूर गेले. दलेल खानास सुभा दक्षणेचा जाला. त्याणी पेडगावी भीमातीरी येऊन राहिलें.

## कलम ५९.

त्या उपर संभाजी राजे त्याजवर इतराज जाले. श्रीघारपुरी ठेविले. पढवायास उमाजीपंत ठेविले होते. तेनाती मावले व स्वार होते. दलेलखानाकडे राजकारण

करून कौल आणून रातोरात स्त्रीसह वर्तमान निघोन पेंडगावास गेले. दलेलखान सामोरे येऊन लष्करांत घेऊन गेले. आदर बहूत केला. डेरे व लोक तीन हजार पठाण तैनात करून लस्कर कुल घेऊन किले भूपालगडास गेले. गड बलें घेतला. कोणी भांडले नाहींत. फिरंगोजी नरसाला हवालदार व विठल भालेराव सबनीवीस पलालें. वरकड गडकरी सांपडले. त्याचे हात व कान घेतले. राजे पन्हाळावर होते. फिरंगोजी नरसाला भेटीस येता गड दीधला म्हणून तोफेंत देऊन उडविला. विठल भालेराव यास बहुत मार दिधला. ब्राह्मण म्हणून सोडिले. राज्यातून बाहेर घातले. कुल तमाम गड खबरदार जाले. कुल धाम पडला. दलालखान विचारी पडला. विजापुराकडे गेला. तेथून भागानगर प्रांतास गेले.

## कलम ६०

त्याउपर संभाजीराजे भेटले जे वर्तमान पातशहास वाके दाखल जाले. दिलेल-खानाकडे लिहून पाठविले होते. त्याजवरून हुजराची तलब आवादी आले. जे संभाजी राजे त्याज बराबर फौज देऊन बलकटीनें हुजूर पाठवावे. इतबा येतांच संभाजी राजे याजबरोबर फौज देऊन रातोरात स्त्रीसहवर्तमान पलविले. पठाण इमानी त्याणी इमान राखिलें. त्याजवर संभाजीराजे किले पनालीस आले. राजे समोर येऊन बहूत आदरे करून घेऊन गेले. किले पन्हाला संभाजी ठेऊन राजे राजगडास गेले. दिलेलखान तेच समई मलीखेड तेथें गेला. भागानगरची फौज मादणा येऊन बहूत भांडण जाले. दलेलखान जेर जाला. माघारा कष्टी होऊन गेला. विजापूर येथील फौज होती त्याउपरी सला केला.

## कलम ६१

त्या उपर पातशाहास जाहीर जाले जे संभाजी राजे यास पलविले. त्याबद्दल येन्नाज होउन प्याला घेउन आहांदी आले. प्याला देउन दिलेलखान या सारिखा मोहरा मारिला.

## कलम ६२

त्या उप्पर दक्षिणेस सुभा शाहा आलम वडील पुत्र शाहाजादा कुल येकत्यारी त्याचे तैनाती राजकर्ण व भावसिंग व जेसिंग कुल तैनाती जाले. आवरंगाबादेस

दाखल जाले. राजगड माहुलीस निराजी राहूजी वकील त्याचे समागमे हुजुरचे कारकून मजमुचे तर्फेनें आनाजी रंगनाथ मलीकर व येसाजी मल्हार वाईकर सुरूर्णीचे तर्फे जे समागमे उभयता कारकून लिहीणार दिधले, व प्रतापराव गुजर सरनौबत पांच हजार फौज हत्ती दोन देऊन प्रतिष्ठेनें औरंगाबादेस पाठविले. सत्तावीस किले पुरंधर व त्रिंबक वगैरे किले देऊन सला जाला. राजेस्वामीस जहागीर बालापूर व श्रीअवढे वगैरे महाल प्रांत वराड जाहागीर दरोबस्त दिधली. सला तीन वर्षे चालिला, मागती विघाड जाला. निराजीपंत व प्रतापराव गुजर हजूर रायगडास आले. सत्तावीस किले पुरंधर व त्रिंबक वगैरे किले मागती घेतले. मोरोपंत पेशवे व केसो त्रिमल यानी माळाकडून किले घेतले. मोरोपंत पेशवे किले सालेर तथें होते. बागलाण काबिलला करून होते.

## कलम ६३

त्या उपरी सिवाजी राजे खुद फौज घेऊन जाऊन सुरतेचा पुरा लुटिला. येकंदर लुटिलें. मत्ता बहूत सापडली. दिल्लीस पातशहास पत्र पाठविलें. जे, तुमचा मामा शास्ताखान त्यास शास्त केली, तुमची सुरत होती ते बेसुरत केली. पातशाही पुरातन हिंदूची आहे. दक्षण तक्त दौलताबाद निजामशा पातशहाचे. आम्ही वजीर कदीम निजामशाही. तुमचें दाक्षिणेस कांहीं नाहीं. पातशाही दिल्लीची तुमची नव्हे. पुरातन हिंदूची आसे. पत्र लिहून पाठविले त्याचे उत्तर फिरून दिल्लीहून आलें नाहीं.

## कलम ६४

त्याउपर दाक्षिणेस सिव्या नाईक व बिदनूरकर पालेगार होते. त्यास पत्र लिहीलें जें आम्हास नालबंदी व फुर्स देत जाणे. व किले आम्हाकडे पाठविणें. ते राज्य पुरातन जबरदस्त. त्याणी उत्तर पाठविले, जे बल होईल तर नालबंदी घेणें. हे उत्तर येताच राजे स्वामिनी मुहूर्त पाहून रायगडहून मोहिमेस चालिले. जाते समई पालखी सिद्ध करून स्वार जाले. ते समई राजाराम त्याची मातुश्रीस ऋतु प्राप्त जाला. हे खबर माहलातून आली. परंतु न जाता नये. समागमें पालखी स्त्रीची घेतली. किले मालवण, सिद्धदुर्ग पावेतों पालखी स्त्रीची होती. ऋतु देऊन

स्त्रीस माघारें रवाना रायगडास केले. तोंच गर्भ राहिला. राजाराम त्याचा जन्म-काल जाला.

## कलम ६५

त्याउपरी सिंदेदुर्गी तमाम आरमारें जहाजे आणून मावले जमाव घेऊन जाहजात बसून पेठ हुसनुर प्रांत गोकर्ण समुद्र तीर बंदर मोठे बिदनुरकराचे होते, ते मारिले. बहुत मत्ता द्रव्य सांपडले. साहुकार धरून मत्ता घेऊन रायगडास कार्य-सिद्धी करून आले. सिवाप्पा नाईक त्यास धाक निर्माण जाला. वकील पाठवून राजे स्वामीस भेटून तह वर्षास तीन लक्ष होन द्यावे असा तह जाला. उमा पंडीत त्या स्थलीं हेजीब नेहमीं ठेविला. सिवाप्पा नाईकाचा स्नेह त्या दिवसा-पासून जाला.

## कलम ६६

त्याउपरी कर्णाटकांत शाहाजी राजे होते त्याचे तैनाती बाजी घोरपडे मुधुलकर सात कोस विजापूर पातशाहाचे चाकर मल्यादार पांच हजार फौजेनिशीं माहाराजे साहेब त्याचे तैनातीस होते. सिवाजी राजे याणी आबदुलखान मारिला. तमाम गड घेतले. राज्य बलकट जाले. कांहीं इलाज नाहीं. बाजी घोरपडे, त्यास येकांतीं कपट सांगोन पातशाहानीं रवाना घोरपडे यास केले होते. त्याउपरी शाहाजी राजे किले तीरवादी नजीक चंदी त्या स्थली लष्कर सडी फौजेनिसी होते. येकोजी राजे व व कबीला चंदाबरी होता. घोरपडे याणी मेहमानीस शाहाजी राजे आणून विश्वास बहूत दाखवून कैद केलें.

कुल लष्कर घोडे हत्ती व मत्ता जप्त केली. हें वर्तमान सत्वर विजापुरास पात-शाहास लेहून पाठविले. ते समई पातशाहा खुश बहूत जाहलें. सत्वर जिलेबदार एकांती बोलाऊन परवाना घोरपडे यास पाठविले, जे, पत्र देखत गार खाणून शाहाजीस गारीत घालून चीप गल्यापासी देऊन धोंडी मोठी डोईवर देऊन बुजून जमीनीमध्यें टाकणें. हे हकीकत लेहून जीलेबदार रवाना केला.

## कलम ६७

या उपरी हे वर्तमान रणदुल्लाखान वजीर वीस हजार फौजेचे सरदार थोर होते. त्याचा व शहाजी राजे याचा भाऊपणा होता. त्यास जाहीर होतांच कागदी सुगडी करून दिवटी हातीं घेऊन पातशाहाचे मजुरीयास गेले. पातशाहास म्हणो लागले; जे आपण मक्केस जातो. कुल वजीर सरजेखान देखील एक जाले. पातशाहा बहूत घाबरे झाले. पातशाहीस दगा पोहोचेल. हे जाणून रणदुल्लाखान यास हाती धरून बसविला. पातशाहाचे आभय घेऊन मुद्दा जाहीर केला, जे सिवाजीचे रागें शाहाजीस कैद करून मारावे, बाप करी बाप पावे. बेटा करी बेटा पावे, कुराणी लिहिलें आहे. हे सक्त रदवदली केली. पातशाहा खुश करून बोलिले, जे शाहाजीस भेटीस हुजूर घेऊन येणे. जामीन तुम्ही होणे. भेटून सवेच जातील. रणदुल्लाखानानें कबूल केले. जामीन जाले. परवाना सोडायाचा घोरपडे यास ताकीद लिहिली जे, सोडून याची वस्तभाव घोडे हत्ती देऊन सन्मानें घेऊन हजीर येणें. हा परवाना तयार केला. जीलेबदार आपला खुद इतबारी रणदुल्लाखाना रवाना केला. जीलेबदारास ताकीद केली, जे, पातशाही जीलेबदार पोचला नाहीं तो जाऊन शाहाजीस सोडून हुजूर आले म्हणजे तुजला इनाम मणभर सोनें देऊ. ऐसा जिलेबदार सिताब रवाना केला.

## कलम ६८

त्याउपरी पुढें पातशाही परवाना घोरपडे यास जाताच शाहाजी राजे त्यास अभ्यंग करून भोजन उत्तम करून लष्कराबाहेर गार खाणून गारीत बसविलें. अंतःकाल समई गीतापठण केलें. त्याउपरी हानवटीस चीप लाउन मोठी धोंडी डोईवर ठेवावी, माती घालून बुजवून टाकावें, तों मागाउन जीलीबदार परवाना घेऊन आला. पातशाही द्वाही देऊन शाहाजी राजे त्यास गारीतून काहाडिले. वस्त्रें देऊन वस्तभाव घोडे हातीं देऊन सन्मानें घोरपडे घेऊन विजापुरास आले. पुढें सामोरे रणदुल्लाखान वगैरे वजीर जाउन पातशाहाची भेट जाली. पातशाहा खुश जाले. वस्त्रें हत्ती घोडे व सदर बकसीस केली. तेच समई पातशाहाची आज्ञा घेऊन रणदुल्लाखान घेऊन बाहीर आले. समस्त वजीरानी मेहमानी केली. पंधरा रोज विजापुरी होते. त्याउपर कर्नाटकांत चंदावर प्रांताकडे गेले. मोहिमेस यावें हा

करार केला. रणदुल्लाखानानें येकांतीं सांगितलें; जे, घोरपडे वगैरे यास पातेजून प्रांत विजापुरास न येणें, पाचीगाववरून सलाम करणें. माहाराज कोल्हापूर व बाळापूर प्रांतीं होते. रणदुल्लाखानाचे गुमट रहीमतपुरी आहेत व झाडें व विहीर अद्याप आहेत.

## कलम ६९

त्याउपर माहाराज राजे श्री सिवाजी राजे यांस सांगून पाठविले जे बाजी घोरपडे यांचे परिपत्य करणें.: त्याचे स्थल मुधानें मारणें. आमचे पुत्र असाल तर देखत पत्र कारण करावे. त्यावरून सिवाजी राजे किले पन्हाळा यास येऊन फौज घेऊन मुधाने मारिले. बाजी घोरपडा जीवें मारिला. तीन हजार माणूस घोरपडे याचे नसन कापून काढिले. आकूजी पुत्र बाजी घोरपडे त्याचा आजुळास गेला होता तो वाचला. गंर्भे दरोबस्त कापिले. सूड घेऊन किले पन्हालीयास आले.

## कलम ७०

त्या उपरी शाहाजी राजे माहाराजे, घोरपडे मारीला हें वर्तमान आईकतांच खुशाल जाहाले. विजईपुत्र त्याची भेट घ्यावी हा विचार करून फौजे सहवर्तमान देशास आले. पुण्यासंनिध सिवाजी राजे याणी सेना कुल जमा करून पुढे सामोरे भेटीस गेले. हातीवर माहाराज देखतांच घोड्याखाले उतरून मजुरा करीत पुढें भेटीस गेले. माहाराज खाले उतरून भेटीचा विचार जाहाला. येक प्रहर आनंदाश्रु पुर लोटला. माहाराज पालखीत बसोन चालिले. पुत्रास बसावयाचा पालखीत आग्रह केला. परंतु सिवाजी राजेश्री याणीं ऐकिले नाहीं. पालखी समागमें पाई चालत पांच कोश पुण्यास दाखल जाले. माहालात गेले. जिजाउसी भेटी ते समई जाली. भोजन वस्त्रें परस्परे जाली. आनंद जाहाला. त्या उपर बाहीर सदरेस येऊन बसले. ते समई सिवाजी राजे याणीं खिजमतगार त्या पासोन वळें पादरक्षा घेऊन हुदेकरी त्यामध्यें उभे राहिले. तों रघुनाथ नारायण हणमंते त्यांणी देखिले त्याणी माहाराज शाहाजी राजे त्यास श्रुत केले. मागे फिरून पाहिले. सिवाजी राजे यास हाती धरून बले संनिध बसविले दोन मास माहाराज होते. सिवापुर खेडे वरें पाहून श्री जेजुरी श्री माहादेव यात्रा करून कर्णाटकांत गेले.

## कलम ७१

त्याउपर रणमस्तखान चाकण नजीक कोलापुर प्रांती आला. प्रतापराव गुजर सेनापती फौजेनिसी युद्धास गेले. युद्ध जाहाले. गोळा लागोन प्रतापराव गुजर पडले. त्याउपर रायगडीं बहिरराव मोहितें त्यास शेनापती जाले. कान्हो मोरदेव गपचुप यास मजमु शेनापतीची होती, ते दूर करून आनाजी रंगनाथ मलेकर यासी किले पुरंधर तेथील सवनविसी दुसरीयाणे पुरंधर घेतला ते समई सवनीविसी सांगितली होती. त्याउपर राजे स्वामी कृपाळु होउन रायगडाचा मुकामी शेनापतीची मंजमु अनाजी रंगनाथ मळेकर त्यास जाली. बयाजी फर्जंद, कारभारी बाबाजी दाजी परभु जमीनीवीस होते. दसऱ्याचे मुहुर्ते मजमु सांगितली होती.

## कलम ७२

त्याउपर शाहाजी राजे माहाराज व रणदुल्लाखान व सरजाखान वगैरे उमराव प्रांत बिदनूर त्या प्रांतीं मोहीम जाली. मुकाम लष्कर मौजे बेदीकीर तुंगभद्रातीर प्रांत बसवापटण तेथें सिकारीस जाता ससा निघाला. त्याचें पाठीं माहाराज घोडीवर होते. भाला घेऊन समस्त सरदारादेखतां ससा मारावयास निघाले. तो घोडीचा पाय आडवा पडला. घोडी मुरकंडोन पडली. शाहाजी राजे खाली पडले. घोडीचा पाय सुताडीत पडोन शांत जाले. त्या स्थली गुमट माहाराज त्याची आहे. मौजे बेदीकीर गांव इनाम दिवाबत्तीस पातशाहानी दिधला. माहाराज शाहाजी राजे त्यांचा मृत्यु याप्रकारे जाला.

## कलम ७३

त्या उपरी विजापुरची पुरा दौलतपुर मारिले. भोवताला आवर्त बहुत मांडिला. हमेशा फौज भोवताली फिरो लागली. त्याजवरून विजापुरच्या पातशाहानी नालबंदी सात लक्ष होन पाठवून देवू केले. रामजी नाईक पुंडे वकीलीस नेहमी विजापुरी ठेविले. सला जाला.

### कलम ७४

त्या उपर भागानगरचा मुलुक तोही जेर केला. तानशाहा व मादणा दिवाण त्यांनीं ही वकील मदनाथपंत पाठवून तह केला. नवलक्ष होन वर्षास द्यावे, नालबंदी घ्यावी. निराजी राउजी हेजीब नेहमी ठेवेले. निराजीपंतास तेथे मृत्यु जाला. त्या उपर प्रल्हाद निराजी वकीलीस होते.

### कलम ७५

त्या उपर येकाजी राजे चंदावरी राज्य करीत असतां रघुनाथ नारायण हणमंते मुजुमदार माहाराज शाहजी राजे त्याचे समई कुल मुखत्यारी होते. त्या उपर येकाजी राजे खुद कारभार करू लागले. रघुनाथपंतास पुसेनासे जाले. त्याजवरून रघुनाथपंत श्री माहायात्रेस जाऊ असी आज्ञा मागितली. तेच क्षणी आज्ञा दिधली. जे, जनार्दनपंत बंधु स्त्रियासहवर्तमान पाचसे स्वार व हत्ती कुल समुदायनिसी विजापुरास आले. पातशाहाची भेटी घेतली. पातशाहानी बहूत आदर केला. वजिरी द्यावी असा विचार जाला. हे वर्तमान सिवाजी राजे पनाली होते त्यास विदित जाहले. त्याणी पत्र रघुनाथपंतास पाठविले, जे, आम्ही आसतां तुरकाची सेवा करणे उचीत नाई. समाधानें पत्र येतांच पातशाहाची आज्ञा घेऊन किले पन्हालीयास आले. राजे सामोरे जाऊन रघुनाथपंतास गडावर आणिले. राजे रायेगडास येऊन मजमु रघुनाथ नारायण यास सांगितली. ते समई निळो सोनदेव मजुमदार शांत जाहाले. त्यानंतर रघुनाथपंतास मजमु जाली.

### कलम ७६

त्या उपर रघुनाथ नारायण रुसून येकोजी राजे त्याजपासी आले. याजबदल राजे स्वामीस येकांती समजाउन सांगितले, जे चंदावरचे राज्य बापरोटी आहे. निमे राज्यामध्यें वाटा धर्म न्याय तुम्हास आहे. बुद्धिवाद सांगेन. कर्णाटकांत जावोन येकोजी राजे त्यास भेटून निमे राज्य जोरावरीनें घेऊन तमाम किले वाटणी घ्यावी. हा तह जाला. याचा निश्चय केला. संभाजी राजे व राजाराम त्यासंनिध मोरोपंत पेशवे व अनाजी दत्तो सुरनीस व फौज व मावळे ठेऊन बंदोबस्ती करून दक्षिण प्रांती चालिले.

## कलम ७७

त्याउपर चालिस हजार पागा मावले चालिस हजार समागमे, व बहिरराव मोहिते सेनापती असे स्वार होऊन जाता कनकगिरी पाले तेथें सेनापतीनें सिंगी (घोडी) वाटेस आरब्याचे (नसन) पाटलापासोन एक्यागावी घेतली. खरेदी केली होती. चैत्र मासी पाऊस वलीव बहूत पडिला. त्याबद्दल सिंगी डेन्याच्या सोडबोती (सभोवतीं) तेथें निवारीयास बांधिली. हे वर्तमान राजे स्वामीस विदीत झाले. तेच समई बहिरराव मजमदार त्यास बोलाउन फजीत बहूत केलें. आनाजी रंगनाथ मलेकर मजमुदार त्याजपासोन पातो पो होन पाठविलें. एक शेपंचवीस सवाशे होन आणून बहिरराव यांचे पदरी होन घालून सिंगीस डाग पागेचा करून पागेस लाविली. पागा पाहाता राजे श्लोक निरंतर म्हणत.

यस्याश्वास्तस्य राज्यं
यस्याश्वास्तस्य सौख्यं
यस्याश्वास्तस्य मेदिनी
यस्याश्वास्तस्य सामराज्यं

## कलम ७८

त्याउपर भागानगरास सिवाजी राजे गेले. पुढें मादणा व उमराव येऊन घेऊन गेले. दाद माहालावर भेटीस पातशाहचे खासा राजे व रघुनाथ नारायण व दत्ताजीपंत वाकनवीस व बहिरराव सेनापती व प्रल्हाद निराजी वकील व अनाजी रंगनाथ मलेकर मजमुदार निसबत सेनापती व खिजमदगार- ... ... दाद महालाच्या सीडीवर पाय ध्यावा तो आनाजी रंगनाथ मलेकर यानी राजेसाहेबास विनंती करून उभे केले. जे भले लोकास दोघे चौघे घेतले पाहिजे. त्यावरून मानसिंग मोरे व रुपाजी भोसले दोघास हुकूम जाहाला. इतक्यानिशी दाद माहालावर गेले. तानशाहा पातशाहा माहालातून आले. इकडून राजे गेले. भेटी जाल्या. रघुनाथ नारायण व प्रल्हाद निराजी यास बसावयाची आज्ञा जाली. वरकड उभे होते. विड्याचा आग्रह बहूत पातशाहानी केला. परंतु विडा घेतला नाहीं. श्रीवाराणसीस जाऊन श्रीची स्थापना करूं तेव्हां विडा घेऊं. विज्यापुरचे पातशाहा व तुम्ही लस्करचा खर्च देणें. दिल्ली पावेतो जाऊन यक राज्य करूं. जे ऐसे

उत्तर पादशाहास दिले. तानशाहा पातशा ह्यानीं वस्त्रें उत्तम व हास्ती व घोडे पांच आरबी उत्तम, दाहा पालखी सुवर्णमय व पांच लक्ष होन ( दिलें ). साहा घटीकावर्ते होते. खालती फौज, लश्कर तमाम व मावले चाळीस हाजार पोषाक समस्तास उत्तम होते. घोडे व हत्ती श्रृंगारून ... ... ... ... ... देउन खालते उतरले. याउपर ... ... जाहले.

## कलम ७९

त्याउपर भागानगरी मुकाम महिनाभर होता. मादणाचे घरी कुल विप्र समुदाय व राजे सरदार दरोबस्त भोजन स्वइच्छा पाच मेहमान्या सर्वांस तीस जाल्या. श्रीकेशव स्वामीची कथा नित्य रोज ऐकत आसत. जाते समई पांच लक्ष होन जवाहीर पंन्नास हजारचे दिलें. त्याउपर भागानगरीहून स्वार जालें.

## कलम ८०

त्याउपर कनोल तुंगभद्रातीर तेथें पाच लक्ष होन घेतले. आनंदराव कनोजकर देशमुख येऊन भेटले. त्याउपर निवृत्ती संगमावरून श्रीसैल्यास गेले. अनंतपुरी वर लष्कर ठेवून तेथून गायमुखापासोन पर्वत वेंधावा व भीमकुंड उत्तरेचा मिळोन तीन कोस साडे तीन गावे कुल पर्वत चढ आहे. दो दिवसी श्रीशैल्यास राजे गेले. त्यास्थळी नऊ दिवस होते. जातांच वैराग्य प्राप्त झाले. विभूती चर्चून सहस्त्र रुद्राक्ष धारण केले. शास्त्रांतील पुराणातील वचने रघुनाथ नारायण यार्णी सांगोन नव दिवसी सावध जाले. नील गंगेस संध्यामठ चिरेबंदी बांधविला. धर्म वहूत केला. ब्रह्मणभोजन यात्रा सांग समस्त लष्करास जाली. लक्ष ब्राह्मणाचा संकल्प करविला. त्याउपर मजल दरमजल चंदीपातास गेले.

## कलम ८१

त्याउपर जातांच वेरुळास वेढा घातला. खालीं डोंगर समीप दोन होते. किले बांधले. त्याचे नाव साजिरे व गोजिरे नावें ठेविली. त्याउपरी तोफा ठेऊन किला जेर केला. नरहरी रुद्र नांववद [ ? ] ठेविले. पांच हजार मावळे व दोन हाजार फौज ठेऊन पलीकडे चंदीस गेले. चंदीस मुकाम चक्रापुरी चक्रवती नदींचे काठी केला. चंदीस किलेदार आंबरखान त्याचे पुत्र आठ जण होते.

५३५५

त्यास सांगोन पाठविले जे विजापूर भागानगरची पातशाही आहे. तुम्ही भेटीस येणें. त्यावरून अंबरखान पुत्रास देखील लस्करांत बेवसवसा आला. येतांच राजे साहेबी कैद केला. चंदी घेतली. रायाजी नलगे हवालदार ठेविले. तिमाजी केशव सबनवीस ठेविले. इमारतीवर रुद्राजी सालवी ठेविले. विठल पिलदेव आत्रे गराडगर सुभेदार माहालचे याप्रमाणें ठेविले. चंदी घेतली.

## कलम ८२

त्या उपर चंदीपलीकडे लस्कर मुकाम मौजे आरदर नजीक त्रिवादी तेथें राहून येकाजी राजे त्यास पत्र पाठविले, जे माहाराज साहेब माघले जन्मापासून नाहीं. भेटीचा हेतु धरून तुम्हांकडे आलो. तुम्ही भेटीस येणें. त्यावरून येकोजी राजे व जगन्नाथपंत दिवाण फौजेसहवर्तमान येऊन श्री सिवाई विधीयुक्त भेटी जाल्या. धर्म बहोत केला. त्यावर भोजनें उभयता एक ताटी जाले. नित्य एक ताटी भोजनें करून एकांती वाद होउ लागला. सन्निध रघुनाथ नारायण व दत्तोजी पंत वाकनीवीस व बाल परभू चिटणवीस व बहिरराव सेनापती व अन्नाजी रंगनाथ मलेकर मजुमदार वाद समई आसेत. चंदावरचें राज्य बाप रोटी निमे तुम्ही घेणें निमे आम्हास देणें. असे सिवाजी राजे म्हणो लागले. येकोजी राजे त्याणी उत्तर दिधले जे देशी मिलविले त्यांतील निमे आम्हास देणें. देसी कांहीं वडिली मिलविलें नाहीं. असे सिवाजी राजे म्हणत असता भांडण शब्दाचे पंधरा दिवस होते. सरशेवटीं निदानी येकोजी राजे म्हणो लागले जे धार दिव्य तुम्ही आम्ही युद्ध करूं. आम्ही फौज जमा करून येतो. तुम्हीही तयार असणें असे बोलोन रुसून चालिले ... सिवाजी राजे पाई समाधान करीत डेऱ्याबाहेर आले. परंतु ऐकिलें नाहीं. घोडीवर स्वार होऊन चंदावरास चालिले. त्यास बोलवीत बहिरराव सेनापती व मानाजी मोरे व रूपाजी भोसले व आन्नाजी रंगनाथ मलेकर असे राजे साहेबी समागमे देऊन चंदावर पावेतो दिधले. चंदावर पावेतो गेले. त्याचा बहुमान वस्त्रें देऊन माघारे वटे लाविले.

## कलम ८३

त्याउपर सिवाजी राजे यानी रघुनाथपंत व सेनापती कुल फौज ठेऊन देशास राजे स्वार देउन गेले. मग समागमे दत्ताजीपंत व बालपरभू चिटणीस व मानाजी मोरे व अनंदराव पंचहजरी घेऊन पन्हालीयास दाखल जाले. मागे युद्ध येकाजी

राजे त्याची फौज जगन्नाथपंत दिवाण व भीवजी व रायभानजी राजे तमाम सरदार वीस हजार फौज व बरखंदाज पन्नास हजार असे चालोन आलें. पंधरा दिवस युद्ध जालें. बाहीर बुणगे चंदीचे आशरीयानें ठेऊन सडेभोवताले चार फौजा करून युद्ध नित्य पंधरा दिवस होतां, एक दिवस चोहीकडून घोडी घातली. प्यादे दोन हजार मरिले. तेच समई मोड जाला. जगन्नाथपंत व भिवजी राजे रायभानजी राजे तमाम वजीर पाडाव जाले. प्यादे पल्होन गेले. चंदावरची फौज बुडाविली. हजार सीपाई, ब्राम्हण व मराठे मिलोन पडिले. रघुनाथपंताकडील पांचशे बारगीर खस्त जाले. मेले. फत्ते जाली. त्याउपर सलुखा जाला. निम्मे राज्य कोवारी ( कावेरी ) उत्तरतीर कांले तहद, बालापूर व कोल्हापूर व माहाराजगड व जगदेवगड व कर्नाटकगड व तमाम वाटणी घेतली. किले घेतले. कडाअरणी किल्ला वेदाजी भास्कर याचे पुत्र आठजण सुभाराव व श्रीनिवासराव वगैरे त्या खालेतीन लक्षाचा मुलुक किले वेणीदुर्ग देखिल इनाम राजश्री राजे स्वामीनी दिधला. माहाराज शाहाजीराजे त्यापासून इनाम असे. त्याचे वांटे कोणी गेले नाहीं वेरुळचा किल्ला तोही फते जाला. त्याप्रांतीं रघुनाथ नारायण चंदीस येऊन देशास बहिरराव सेनापती कुल फौज घेऊन चालिले. कर्नाटक पन्नास लक्ष होनाचा मुलुक राज्य घेतले होते.

## कलम ८४

त्याउपर विज्यापूरचे पातशाहानीं फौज बहिरराव सेनापती याजवर वाटेस आडवी फौज प्रथम हुसेनखान मायणा दहा हजार फौजे निसी युद्धास आला. चंदीवरून घेतले म्हणोन आले. युद्ध बहूत जाले. हुसेनखान मायणा पाडाव केला. फौज कुल बुडाविली. सवेंच त्या मागे लाधीखान सरदार होता त्यासही बुडविले. दोनहि सरदार पाडाव जाले. रायगडास उभयतास घेऊन गेले

## कलम ८५

त्याउपर तेच समई कापले व बाहादूरबिंडा किला घेंतला. बहिरराव त्या समागमें संताजी घोरपडे व बहीरजी घोरपडे याणीं तरवार केली. म्हणोन नवसील विशेष तैनाती केली म्हणोन राजे इतराज जाले. ते समई येकोजी खांडेकर त्यापासी धनाजी जाधव होते. ते समई तरवार केली म्हणोन नवाजीनें जुमला त्यास सांगितले. त्याची मजमु भानाजी तुकदेव होते.

### कलम ८६

त्याउपर रायगडास बहिरराव मोहिते सेनापती व अनाजी रंगनाथ मलेकर मुजुमदार याजवर मेहेरवान जाले. बकसीस दिधली होती. फत्ते करून आलें तें समई दिल्ही.

### कलम ८७

त्याउपर वेदमूर्ती गंगाभट वाराणसीकर येउन रायगडी मुंजी वंधन पट्टाभिषेक सिंहासनारुढ जाले. पती जाले. शके १५९६ आनंदनाम संवत्सरे. चैत्र शु॥. १ तें दिवसी छत्रपती जाले.

### कलम ८८

त्याउपर फौज कुल घेउन कसवे जानहापुर मारिलें. फकीर वली होता. त्यास कष्टी केलें. द्रव्य घेतलें. तें समई रणमस्तखान धावून आला. युद्ध जाले. सिदोजी निंबालकर पंचहजारी त्यास गोला लागोन पडताच राजे रातोरात किलेपठियास फौजेसहवर्तमान आले. गडाचे नाम किलें विश्रामगड नाम ठेविले. मानाजी मोरे व संताजी घोरपडे याजवर इतराज जाले. युद्ध समई उतावली केली म्हणून मजुरीयासी येउ दिल्हे नाहींत.

### कलम ८९

त्याजउपर किले रायगडास राजे गेले. दसरा होतांच कुल फौजा सरदार मुलुकगिरीस रवाना केल्या. ते उपर राजे स्वामीस व्यथा नवज्वर जाला. शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्री पौर्णीमा दोन प्रहरा राजे स्वामी कैलासवासी जाले. अंतकालीं वहूत धर्म केला. सहस्र रुद्राक्ष परिधान, भागीरथी उदके स्नान, विभूतींचें चर्चन केलें. सावधपणें सिवस्मरणे करून देह ठेविला. हरदास कीर्तन. अंतकाल समई मोरोपंत पेशवे व आनाजी दतो सुरनीवीस व बाल परभू चिटणवीस होते. तहपत्रें देऊन सावधपणें देह ठेविला.

### कलम ९०

त्या उपर समीप राजाराम होते. संभाजी राजे किले पन्हाला होते. मोरोपंत पेशवे व अनाजी दत्तो सुरनवीस याउपर इतराज जाले. किले पन्हाला कुल सरदार जाऊन भेटले. त्यापुढें वर्तमान सर्वांस विदीत प्रसिद्ध आहे.

कलम ९१

सदरहू आख्यान संकलित नव्वद प्रकरण पुण्यश्लोक राजा त्याची कथा वर्तली ती लिहीली आसे.

कलम ९२

हस्ताक्षर खंडो आनाजी मळेकर यांचे वडिलीं संग्रह केला होता. रायगड दप्तरीं संग्रह वंशावली होती. त्याची तालीक वडिलापासी होती. संकलीत लेहून ठेविली होती.

( परिशिष्टे )

राजेश्री सिवाजी राजे त्याचा जन्मकाल शके १५४९ क्षयनाम संवत्सरे वैशाख शु॥ २ गुरुवार. आयुष्य वर्षे ५३. शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र पौर्णिमेस शांत झाले. मुकाम रायगड. बालत्व १७ वर्षे. राज्य केले ३६ वर्षे. एकूण ५३.

राज्य आरंभापासोन ता॥ सुमारे वर्षे झाली.

| | |
|---|---|
| खासे शिवाजी राजे थोरले | ३६ |
| संभाजी राजे | ७ |
| राजेश्री राजाराम | १३ |
| मातोश्री ताराबाई व राजेश्री शिवाजी राजे | ८ |
| रो॥ राजा शाहू ता॥ शके १६६१ | |
| सिद्धार्थी नाम संवत्सरे | ३२ |
| | ९६ |
| धाकुटपण बालत्व थोरले शिवाजी राजे | |
| कारकीर्द दादोजी कोंडदेव. | १७ |
| | ११३ |

---

यादी किल्ले दौलताबादेस रामदेवराव हेमाडपंत राज्यकारभार करीत होते. त्यास वर्षे शके १२५५ मन्मथ नाम संवत्सरे मु॥ वर्षे शके १६६१ सिद्धार्थी नाम संवत्सरे. वर्षे झाली ४०६.

---

## शिवाजीची बखर

यादी किले चंदी घेतली. राजेश्री यंकोजी राजे त्याची भेट झाली. किले वेरोळ कोट घेतला. त्या स्थळीं शके १५९५ प्रमादी नाम संवत्सरें चैत्र बहुल त्रयोदशी भौमवासर ते दिवशी अंगास राजे स्वांमी यांचे आली. पांच घटिका अंगांत होती. वाक्य भविष्य सांगितलें. श्रींचें वाक्य तपसील संक्षेप.

१ देशीचे राज्य ताम्र घेतील. रायगड जाईल. राजे संभाजी राजे सांपडतील, राज्य जाईल.

२ राजेश्री राजाराम राज्य करील. चंदांचे राज्याकडून मागती राज्य देशीचे प्राप्त होईल.

३ पुढें राजा सिव मागंती अवतार राज्य दिल्ली पावेतो घेतील. एक राज्य होईल.

४ पुढें २७ पिढ्या भोसले यांचे राज्य असे.

५ पूर्वी पूर्वजन्मी सिवाजी राजे याणीं सत्तावीस कावडी भागीर्थी उदक श्री रामेश्वरास नेऊन घातले. २७ जन्मे श्री भवानीस श्रीकमळें वाहिली.

६ याजबद्दल २७ पिढ्या राज्य भोसले यांचे असे. त्या उपर २७ वा राजा गर्भांध होईल. तो राज्य बुडवील.

सदरहू भविष्य राजीयाचे श्री भवानी वाक्य कथन केले. प्रश्न रघुनाथ नारायण हनुमंते त्याणी केला. दत्ताजीपंत वाकनवीस व बाल परभू चिटनवीस त्याणी वाक्य लेहून ठेविले होते. फर्द सुमारे २४ होते. रायगडी कागद लिहिले होते. त्याची संक्षेप यादी आनाजी रंगनाथ मलेकर यापासी होती. त्याची तालीक लिहिली असे.

---

यादी सेनापती व मुजुमदार झाले ई॥ राज्य त॥ राज्य हाली शाहूराजा सु॥र तपसील शके १६६१ सिद्धार्थीनाम संवत्सरे.

**सेनापति अ॥ सु॥ व॥**

१ ... दावतोंडे. सरनोवत हुकूम मानीनासे झाले. मुऱ्हारज गडेनजीक सीवापट्टण तेथें चौरंग करून मारिले.

**मजमूदार निमे सेनापती अ॥**

१ प्रथम वेजु मुकुंद दावतोंडे व पालकर.

१ नेताजी पालकर. मोगलाईंत गेले. स्थान भ्रष्ट झाले व जातिभ्रष्ट झाले.

१ प्रतापराव गुजर. रणमस्तखानाचे लढाईंत पडला.

१ बहिरराव मोहिते बाईस गोळा लागून पडले. कारकीर्द संभाजी राजे.

१ माहादाजी नाईक पानसंबल कारकीर्द राजाराम मु॥। चंदी कर्नाटक प्रांत.

१ संभाजी घोरपडे कारकीर्द राजाराम स्वामी द्रोह केला. राधाई मानीने नि॥।...मारिलें.

१ जोसिंग जाधवराव त॥ राजा शाहू वडगांव जि॥ पन्हाला. गंडमाळा व्यथेनें मेले.

१ चंद्रसेन जाधवराव, पुत्र जाधवराव त्याचे मागें लढाईंत गेले. स्थानभ्रष्ट झाले.

१ संताजी जाधवराव त्याचे पुत्र धनाजी जाधवराव.

१ मानसिंग मोरे.

१ खंडेराव दाभाडे.

१ त्रिंबकराव दाभाडे तांम्राचे...राजेश्री

१ कान्हो मोरदेव गुपचुप पालकर व गुजर.

१ अनाजी रंगनाथ मलेकर, बहिरराव मोहिते. कारकीर्द सिवाजी राजे.

१ गोविंद गंभीरराव व बहिरराव मोहिते त॥ संभाजी राजे.

१ महादाजी तुकदेव, बहिरराव मोहिते. कारकीर्द संभाजी राजे. गरबड झाली. ते समई.

१ अनाजी रंगनाथ मलेकर कारकीर्द राजाराम मु॥ चंदी, माहादाजी नाईक यास बलमागती मजमु झाली. निळो बल्लाल परभू चिटनवीस जमीन नि॥।.

१ कान्हो मोरदेव गपचूप मागती मु॥ चंदी नि॥ संताजी घोरपडे.

१ गोपाळ अनंत ठकार कारकीर्द राजाराम धनाजी जाधवराव सेनापती.

१ भवानी त्रिंबक नि॥ जाधवराव कारकीर्द राजाराम ताराबाई.

१ कल्याण सिवदेव नि॥ संताजी जाधवराव.

शामरांव आबाजी नि॥ मानसिंग मोरे.

१ भास्कर बल्लाळ सेणवे नि॥

| | |
|---|---|
| बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान त्यांणी युद्धी मारिलें. प्र॥ गुजराथ. | खंडेराव दाभाडे. |
| १ यशवंतराव दाभाडे हल्लीं आहेत. | १ हल्ली धनबा सेणवे नि॥ यशवंत-दाभाडे. |
| —— | —— |
| १३ | १३ |

सदरहू सेनापती व मुजमुदार झाले. जमीनीविसी जी पुरातन बाबाजी बाजी परभू त्याची देशकुलकर्णी हिरडस मावल त्याचे पुत्र हल्लीं खंडो बाबाजी परभू जमिनीसी करतात. हल्ली आसेत.

## शिवशकावली

### १६०९—१६६८

१६०९ राजाराम चंदीस गेले. सेनापती महादजी नि॥ पानसंबळ [शिव शके १४. सन १०९७]

१६११ चंदीस वेढा बसला. [शि. श. १६ स. १०९९]

१६२१ पातशाहांनी सातारा घेतला. राजाराम सिंहगडी मृत्यु पावले. [शि. श. २६ स. ११०९]

१६२८ औरंगशाहा नगरी मृत्यु पावले [शि. श. ३३ स. १११६]

१६२९ आजमदशाहा युद्धी मृत्यु पावला [शि. श. ३४ स १११७]

१६३० बाहादुरशाहा येऊन कामाण्णास भागानगरी मारिले. राजा शाहू दक्षिणेस येऊन राज्यारूढ झाले. (सर्वजित् सं). [शि. श. ३५ स. १११८]

१६३६ हैबतराव निंबाळकर सरलस्कर वायपट (?) प्रांतीच मृत्यु झाला. [शि. श. ४१ स. ११२४]

१६३९ सिंहस्थसालीं बाळाजीपंत दिल्लीहून आले. तांम्रासी सख्य केले. [शि. श. ४४ स. ११२७]

१६४९ संभाजीराजे निजाम. नजीक पैठणी बाजीरावाची फत्ते झाली [शि. श. ५४ स. ११३७]

१६५६ सिंहासनारूढ रायगडी थोरले राजे जाले. चैत्र शु॥ १ आनंदसं

१६६० स्वारी राजेश्री बाजीराव मुख्य प्रधान दुर्योधन तांब्र पराभव प्रांत माळवे भुपालगड [ शि श. ६५ स. ११४८ ]
१६६५ विजापुरांत शाई तांब्रानीं घेतली.
१६६८ संभाजी राजे तुळापुरी मृत्यु पावले. साठ वर्षें झाली.

धर्मराजाचे घराण्याचे पुरुष आठ झाले. निमे चक्र राजाचे कारकीर्दीत हस्तनापुरीच वस्ती होती. पुढें नववा पुरुष राजा चित्ररथ याचे कारकिर्दीस हास्तनापुरी श्रीगंगा येऊन बुडविलें. सबब इंद्रप्रस्थ ऊर्फ दिल्लीस येऊन राज्य करू लागले. पुढील युधिष्ठिराचे घराण्याचे आठ पुरुष झाले. मु॥ वर्षें ५८२ मास ९ दिवस १४. याजपुढें इंद्रप्रस्थी राज्य करू लागले चित्ररथापासोन.

## शकावली

### शिवजन्मापासून इंग्रजानीं पुण्यावर झेंडा रोवी पर्यंत

### शके १५४८--१७३९

| | | |
|---|---|---|
| १५४८ | क्षय. सं | किले सिवनेरी येथें सिवाजी राजे यांचा जन्म झाला. |
| १५९६ | आनंद. | सिवाजी राजे यास राज्याभिषेक झाला. |
| १६२९ | सर्वजित् | दिल्लीहून शाहू माहाराज राज्यावर पौष मासी आले. संकराजी नारायण सचीव कैलासवासी झाले. पुढे मुतालिक पंताजी सिवदेव ( साल ३४ ) |
| १६३० | सर्वधारी | मोरो शंकर सचीव १६ महिन्याचें वय होते. |
| १६३३ | खर | दाखला इनामगांवचा राजपत्र पंताजी सिवदेव राजाआज्ञा यांचे नावें. कारकीर्द मोरोपंत पिंगळे प्रधान रुजु बहिरो मोरेश्वर. राज्यास साल ३८. |
| १६३५ | विजय | दाखला राजपत्र मोरोपंत पेशवे रुजु बहिरोपंत ता॥ राज्यास साल ४०. |
| १६३९ | हेमलंबी | दाखला इनामगांवचा राजपत्र पंताजी सिवदेव यांचे नावें. कारकीर्द बाळाजी विश्वनाथ प्रधान. |
| १६५१ | सौम्य | कार्तिक व॥ १२ पंताजी सिवदेव राजाआज्ञा व खासगी कैलासवासी झाले ता॥ साल राज्यास ५६. |
| १६७१ | शुक्र | मार्गशीर्ष शु॥ १३ वारसी पालगावीहून भोमवारी राजाराम कृष्णातीरी माहुली संगमी आले. तेथें श्रीमंत |

बाळाजी बाजीराव पंत प्रधान पुढे पौष शु॥ ८-
सप्तमीस आले. दशमीस राज्यासनी बैसले. नक्षत्र २१
घटी ५१ योग १२ घटी ४१.
क्षिति नगनृपशाके ( १६७१ ) मार्ग कृष्ण तृतीया
भृगुगुरुयुतेन्हि प्राद्गले शुक्र वर्षे ।
निखिलभुवननाथो भार्यया शाहुवर्मा
दिणमणि दिवचास्तं देवलोकं जगाम ॥
शाके भूऋषिशास्त्रभूपरिमिते ( १६७१ ) शुक्रद्वये विश्वभे
मार्गे शुक्लतृतीयका भृगुयुते योगे ध्रुवाख्ये शुभे ।
श्रीमत्संपरुषिस्थले नृपवरः श्रीशाहु संज्ञो नृपः
पंचत्वं समवाप दक्षिणदिशःपालः प्रतापी महान् ॥

१६८१ प्रमादी श्री भाऊसाहेब व विश्वासराव इंदुस्थानचे स्वारीस गेले. गंगातीरास जाता नवाब निजामअल्ली याणी युद्ध होऊन सा लक्षाची जाहागीर व नगरचा किल्ला दौलताबादचे किल्ले घेऊन पुढे स्वार होऊन गेले.

१६८५ सुभानु राज्य शक सालमजकुरी वैशाखमासी नबाब निजाम अल्ली प्रां पुण्यास येऊन शहरची तसलस केली. प्रांतात दंगा झाला. सिंहगड लोहगडची पेठ लुटली गेली. कारकीर्द श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान. नबाबाचे राज्यांत जाऊन दंगा करून शक मजकुरी जात. आषाढमासी स्वारी राक्षसभुवनावर गंगातीरास येऊन नबाब निजाम अल्लीची लढाई मातबर होऊन नवाबाची बहुत खरावी होऊन सरदार त्याचे फार लढाईत पडून मोड करून नवाब भागानगरास गेले. श्रीमंत स्वारी पुण्यास आली.

१६९४ नंदन श्रीमंत माधवराव बल्लाल प्रधान गणपती थेऊरचे मुकामी कैलासवासी जाले. नंतर शके १६९५ विजय. श्रीमंत नारायणराव बल्लाळ प्रधान भाद्रपद शु.॥ १४ कैलासवासी जाले. नंतर श्रीमंत रघुनाथ बाजीराव.

| | | |
|---|---|---|
| १६९६ | विजय | वैशाख शु॥ ७ इंदुवासर पुनर्वसु नक्षत्र किल्ले पुरंदर येथें जन्म श्रीमंत माधवराव नारायण प्रधान. |
| १७१४ | परिधावी | एक वर्ष धारण ८८१ जाली. प्रांत वोस. प्रजा गेली. मेली. |
| १७१६ | आनंद | हरीपंत तात्या फडके कैलासवासी झाले. व शक मजकुरी मार्गशीर्षमासी डेरे दाखल सवाई माधवराव होऊन स्वारी मोगलावर खर्डे याजवर लढाई झाली. नवाव सिकस्त करून स्वारी श्रीमंताची वैशाख मासी शके १७१७ त पुण्यास आली. |
| १७१७ | राक्षस | आश्विन शु॥ १५ श्रीमंत माधवराव कैलासवासी झाले. नंतर शकमजकुरी माघ शुक्लपक्षी श्रीमंत बाजीराव साहेब. |
| १७२१ | सिद्धार्थी | फाल्गुन व॥३ नाना फडणवीस कैलासवासी झाले. |
| १७२४ | दुंदुभि | आश्विन व॥ १४ होलकराची लढाई. पुणें घेतलें. पुण्याची तसनस बहुत केली. |
| १७२६ | रक्ताक्षी | प्रांत पुणें येथें पर्जन्यकाळीं चार मास शेर धारण होऊन प्रांत उध्वस्त जाला. कोकणांत ६ शेर धारण जाली होती. मोठा प्रळय होऊन प्रजा गेली. मेली. गंगातीर वगैरे वोस पडले. |
| १७३७ | धाता | आषाढ गंगाधरशास्त्री पंढरपुरी इंग्रजाकडून मारले गेले. |
| १७३९ | ईश्वर | आश्विन व॥ ११ इंग्रजाची लढाई झाली. दुसरी लढाई कार्तिक शु॥ ८ रविवार सायंकाळी शक मजकुरी. लढाई प्रारंभ तेच दिवसी मध्यरात्रीस श्रीमंत बाबासाहेब पळोन माऊलीकडे गेले. दुसरे दिवशी प्रातःकाल होतांच पावेतो बापु गोखले वगैरे पळोन गेले. तेच दिवशी शु॥ ९...इंग्रजांनीं झेंडा पुण्यात...... |

# नद्या, ओढे, किल्ले, गड, घाट, देश, प्रांत व गावें

## यांची सूचि

( आंकडे कलमाचे आहेत )

### नद्या व ओढे

आंबिलावल ( ४६ ). इंद्रायणी ( १९ ). कावेरी ( ८३ ). कोयना ( ३२ ). गंगा ( ७,५५ ). चक्रवती ( ८१ ). तुंगभद्रा ( ७२,८० ). नर्मदा ( १२,१६, १७ ). नीलगंगा ( ८० ). भीमा ( १८,१९,५५,५८ ).

### किल्ले, गड व घाट.

कडाआरणि (८३). कर्णाटक गड (८३). कापले किल्ला (८४) कुलगड (३६) कोंडाणा ( ४९ ). गोजिरे कि. ( ८१ ). चंदन वंदन ( ३६ ). चाकण ( १९, २०,२९,४३,७१ ). जगदेव गड ( ८३ ). तोरणा ( २९ ) देवगड ( ५५ ) नरहरीरुद्र ( ८१ ). निंबे देव्हारे ( ७ ). निशानी घाट ( २९ ). पन्हाला ( ३६,३७,५९,६०,६९,७५,८३,९० ). पद्मावती ( २९ ). पारगड ( ३६ ). पावनगड ( ३८ ) पुरंदर ( २७,२९,४०,५०.६२,७१ ). प्रतापगड ( २९, ३१,३२ ), प्रचंडगड ( २९ ). बहादूरबिंडा ( ८४ ). भिवगड ( ३६ ). भुलेश्वरगड ( २० ). भूपालगड ( ४३,५९ ). महाराजगड ( २२,८३ ). माहुली ( १३,१४,१७,६२ ). रडतोंडी घाट (२९, ३२,३५ ). राजगड ( २९,४०, ४२,४६,४९,६० ). रायगड ( २९,४७,४९,५१,५६,६२,६४,७१,७५,८४, ८६,८७,८९ ). विजयदुर्ग ( ४२ ). विशालगड ( ३६,३९ ). विश्रामगड ( ८८ ). शिवनेरी ( १५,२० ). साजिरे ( ८१ ). सालेर ( ६२ ). सिंधुदुर्ग ( ४२,६४,६५ ). सिंहगड ( २९,४९,५० ). सुवर्णदुर्ग ( ४२ ). सुवेळा ( २९ ).

५३५५ (६६)

uct. E (Lond)

## देश प्रांत व गांवें

'-14-0 net.

आरदर (८२) आलापुर (२३) आवढेप्रांत (६२) आशेर ( इंदापूर (२०) इंदूर (५५) उत्तरमानस (५५) औरंगाबाद (२३,५१,६५ net. कडवली (५५) कनकगिरी (७७) कनोल (८०) कर्णाटक प्रांत (१६,२२, ३१,६६,६८,७०,७६,८३) कलगिरी (२१) कल्याण (१३. ४२) काशो (३२,५६) कुलाबा प्रांत (४२) कोरेगाव (१८) कोल्हापुर (२२,६८, ७१,८३) खानदेश (२३) खेडबरें (२१) गया (३२,५५) गुडगी (२३) गोकर्ण (६५) गोणीमठ (४१) गोवें (४२) घारापूर (५९) घ्रष्णेश्वर (१०) चक्रापुर (८१) चांपे प्रांत (५५) चंदी (६६,८१–८४) चंदीपात (८०) चंदावर (२२,२४,६६,६८,७५,७६,८२) जान्हापूर (८८) जावळी (२९) जुन्नर (२०) जेजुरी (७०) जोवर (२९) तळ-कोंकण (४२) तळेगांव (१८) तुळजापुर (३१,३५) तुळापुर (१९) त्रिबंक (६२) त्रिवादी (६६,८२) दिल्ली (१२,१४,१७,२३,२५,२६,४१, ४८,५०,५१,५४,५५,५७,६३) दौलताबाद (१,७,८,९,१२,१७,१८,२३, ६३, ७३) नगर (२,४१) नाइकवाडी (२७,२८) नारणगांव (१९) नारायण पेठ (५०) निवृत्ती (८०) पाचीगांव (६८) पारगांव (३२) पुणे (१९,२०,२४,२९,३०,४७.७०) पेडगांव (५०,५८) प्रयाग (५५) फलटण (७) बऱ्हाणपुर (१७,२३) बसवा पट्टण (७२) बागलाण (६२) बालापुर (२२,६२,६८,८३) बांदे जोड (४२) बिदनूर (७२) बेरामावळ (२९) भागानगर [५९,६०,७४,७८,७९,८१) भिवंडी (१३,४२) भीमकुंड (८०) मक्का (६७) मदुरा (२२) मलकर (२०,४३) महादेव (१८,७०) महावळेश्वर (२९) मालवण (६४) माहोर (२६) रहिमतपूर (६८) राजापूर(४२) वऱ्हाड (२३) वाई (२०,२९,१३,३२,३५) वाराणसी (५५,७८) विजापूर (१४,१६,१८,२०–२४,२९,३१,३७,३९,५९ ६६,६८,७३,७५,७८ ८१,८४) वेरूळ (१,४,९,८१,८३) शिरवल (२०) श्रीगोंदे (६,७) श्रीशैल्य (८०) सांडसखुर्द (१९) सातारा (३६) सासवड (३१) सिंदखेड (१,९,१६) सिवापूर (२१,७०) सुरत (६३) हसनूर प्रांत (६५) हिवरें (३१,३५)

REFBK-0005355

REFBK-0005355